संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा






उदयाचा सुर्य तू. सुर्याचा पूर्व तू..

मा.श्री.ॲड. अवधुत भगवानराव फुलसौंदर

आपणांस उदंड आयुष्याच्या अनंत शुभेच्छा

* शुभेच्छुक *

वैष्णव मित्र मंडळ, फुलसौंदर मळा, अहिल्यानगर



रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, मंगळवार दि. ०५.०८.२०२५ | अंक नं. १०८ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020









मंगलमय मंगलागौर आणि भावबंधाची राखी या आनंदसोहळ्यांसाठी आजच बुक करा!

तसेच लग्न समारंभ, मुंज, साखरपुडा, वाढदिवस, नामकरण, कॉर्पोरेट इव्हेंट्स, पार्टीज आणि आपल्या हृदयात घर करणाऱ्या कोणत्याही कार्यक्रमासाठी सुयोग्य असे ठिकाण.

जिथे आपल्याला मिळेल
वातानुकूलित भव्य बॅन्क्वेट हॉल (३००+ पाहुण्यांची क्षमता)
प्राकृतिक सौंदर्याने नटलेले प्रशस्त लॉन (६०० + पाहुण्यांसाठी)
८ प्रशस्त, सुसज्ज व अटॅच बाथरूम खोल्या
आणि प्रशस्त पार्किंगची सुविधा

उत्सव लॉन्स अ‍ॅन्ड बॅन्क्वेट

* बुकिंग व अधिक माहितीसाठी *
738-5951-303
9922-4343-15
नगर-कल्याण रोड, ड्रीम सिटी सोसायटीजवळ, अहिल्यानगर.


# अहिल्यानगरमध्ये खोटे गुन्हे दाखल करण्याचे सत्र सुरूच; कायद्याचा दुरुपयोग करून आवाज दाबण्याचा होतोयं प्रयत्न

नगर - अहिल्यानगर शहरासह जिल्ह्यात कायद्याचा दुरुपयोग करून खोटे गुन्हे दाखल करण्याचे सत्र सुरूच आहे. हा सर्वसामान्यांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न केला जात आहे. अशाच प्रकारे माजी जिल्हा परिषद सदस्य संदेश कार्ले यांच्यावर ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून तो तातडीने रद्द करत या प्रकारांना वेळीच आळा घालावा, अशी मागणी राजकीय पदाधिकारी, नागरिकांच्या शिष्टमंडळाने जिल्हा पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

नगर तालुक्यातील घोसपुरी गावात सरपंच किरण साळवे, उपसरपंच संतोष खोबरे, माजी उपसरपंच व विद्यमान ग्रामपंचायत सदस्य विठ्ठल हंडोरे, ग्रामपंचायत कर्मचारी सुधीर झरेकर हे २ ऑगस्ट रोजी दुपारी मियावाकी वृक्ष लागवड करण्यासाठी गावच्या शिवारातील सरकारी जमिनीची जेसीबीच्या सहाय्याने साफसफाई करत असताना त्या परिसरात शासकीय जागेवर अतिक्रमण करून राहणाऱ्या स्वामी सर्जेराव चव्हाण या व्यक्तीने अचानक विठ्ठल हंडोरे यांच्यावर लोखंडी पाईप व दगडाने जीवघेणा हल्ला केला. यात त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. त्यांना उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले असता त्यांना भेटण्यासाठी माजी जिल्हा परिषद सदस्य संदेश कार्ले हे रुग्णालयात गेले. त्यावेळी हल्ला करणारा चव्हाण व त्याचे कुटुंबीयही जिल्हा रुग्णालयात गेले होते. तेथे संदेश कार्ले यांनी त्यांना उगाच भांडणे, मारामाऱ्या करू नका, तुमच्या घरकुलाचा प्रश्न आपण सोडवू, असे समजून सांगितले. त्यानंतर चव्हाण कुटुंबातील एका महिलेने ४ ऑगस्ट रोजी रात्री उशिरा तोफखाना पोलिस ठाण्यात जावून संदेश कार्ले यांनी जातीवाचक शिवीगाळ करत धमकी दिल्याची फिर्याद दिली.

या फिर्यादीवरून पोलिसांनी संदेश कार्ले यांच्याविरुद्ध बी एन एस कलम ३५२, ३५१ (२) (३) अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम १९८९ चे कलम ३ (१) (आर), ३ (१) (एस) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. सदर गुन्हा हा खोटा असून कायद्याचा दुरुपयोग करत दाखल केलेला असल्याचा आरोप घोसपुरीच्या ग्रामस्थांनी केला आहे. स्वामी चव्हाण हा व्यक्ती खोटे गुन्हे दाखल करण्यात पटाईत असल्याचेही या निवेदनात म्हटले आहे.

संदेश कार्ले यांच्याविरुद्ध दाखल करण्यात आलेला खोटा गुन्हा तातडीने रद्द करण्यात यावा तसेच ग्रामपंचायत सदस्य विठ्ठल हंडोरे यांच्यावर जीवघेणा हल्ला करणाऱ्या स्वामी चव्हाण याच्यावर जीवे मारण्याचा प्रयत्न करणे, सरकारी कामात अडथळा आणणे आदी कलमान्वये तातडीने गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी घोसपुरी ग्रामस्थांनी केली आहे.

यावेळी घोसपुरी ग्रामस्थांसमवेत शिवसेनेचे शहर प्रमुख सचिन जाधव, माजी शहरप्रमुख संभाजी कदम, माजी नगरसेवक शाम नळकांडे, सुरेश तिवारी, दत्तात्रय कावरे, कैलास शिंदे, संजय शेंडगे, ओंकार सातपुते, माजी पंचायत समिती सभापती रामदास भोर, माजी जिल्हा परिषद सदस्य बाळासाहेब हराळ, घोसपुरीचे सरपंच किरण साळवे, उपसरपंच संतोष खोबरे, माजी उपसरपंच प्रभाकर घोडके, अशोक झरेकर आदी उपस्थित होते. *(छायाचित्र पान २ वर)*

# गंज बाजार भाजी मार्केटमधील ओटेधारक व गाळेधारकांना मनपाकडून जप्तीच्या नोटिसा

**वारंवार संधी देऊनही थकबाकी न भरल्याने कारवाई सुरु; १५ दिवसात संपूर्ण थकबाकी न भरल्यास गाळे ताब्यात घेऊन लिलाव करणार**

नगर - शहरात महानगरपालिकेच्या असलेल्या विविध गाळे व वर्ग खोल्यांची थकबाकी २५ कोटींवर पोहोचली आहे. संधी देऊनही गाळेधारक थकबाकी भरत नसल्याने महानगरपालिकेने कारवाई सुरू केली आहे. मध्य शहरातील गंज बाजार येथील गाळेधारक व ओटे धारकांकडे सुमारे ३ कोटी रुपयांची थकबाकी आहे. या ठिकाणी १४१ गाळे व ओटे असून त्यापैकी ६५ जणांना महानगरपालिकेने जप्तीच्या नोटीसा बजावल्या असल्याची माहिती आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिली.

गंज बाजार भाजी मार्केट व व्यापारी गाळ्यांमध्ये १४२ गाळेधारक व ओटेधारक आहेत. त्यातील एका गाळ्याची हस्तांतरण प्रक्रिया झालेली आहे. उर्वरित १४१ गाळे धारकांचे करारही संपुष्टात आलेले आहेत. मार्च महिन्याच्या अखेरीस महानगरपालिकेने कारवाई सुरू केल्यामुळे गाळेधारकांनी पैसे जमा करण्याची तयारी दर्शवली होती. मात्र अद्यापही येथील गाळेधारकांकडे तीन कोटी रुपयांची थकबाकी आहे. महानगरपालिकेने एप्रिल व मे महिन्यात केलेल्या सर्वेक्षणानुसार सर्व माहिती संकलित करण्यात आली आहे. गाळेधारक वारंवार संधी देऊनही थकबाकी भरत नसल्याने सदर गाळे ताब्यात घेण्याबाबत कारवाई सुरू केली आहे. कारवाई झाल्यानंतर हे गाळे पुन्हा लिलाव करून दिले जाणार आहेत.

१४१ गाळेधारकांपैकी सुमारे ८० ओटे धारक आहेत. तसेच इतर गाळेधारक आहेत. यातील ६५ जणांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ८१ ब नुसार जप्ती कारवाईच्या नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. पंधरा दिवसांच्या आत थकबाकीदारांनी संपूर्ण थकबाकी न भरल्यास त्यांच्यावर जप्ती कारवाई करून ओटे व गाळे ताब्यात घेण्यात येणार असल्याचे आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी स्पष्ट केले आहे. महानगरपालिकेने वारंवार थकबाकी भरण्याची संधी दिलेली आहे. तरीही प्रतिसाद मिळत नसल्याने महानगरपालिकेकडे कारवाई शिवाय दुसरा कोणताही पर्याय राहिलेला नाही. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम व राज्य शासनाच्या निर्देशानुसार भाडे आकारणी केली जात आहे. नवीन करारनामे व भाडे आकारणी नियमानुसारच केली जाणार आहे, असेही आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी स्पष्ट केले आहे.

# नगर येथील कांदा व्यापाऱ्याची १३ लाख ३२ हजारांची फसवणूक

नगर - नगर बाजार समितीच्या नेप्ती कांदा मार्केट मधील व्यापाऱ्याकडून ट्रान्सपोर्ट द्वारे कांदा खरेदी करुन कांदा खरेदी मालाचे १३ लाख ३२ हजार ३४२ रुपये न देता व्यापाऱ्याची फसवणूक केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात ४ ऑगस्ट रोजी पुणे जिल्ह्यातील पुरंदर येथील ३ जणांविरुद्ध फसवणूकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत कांदा व्यापारी राहुल रामदास आंधळे (वय ३१, रा. पारिजात कॉर्नर, गुलमोहर रोड, सावेडी, अ.नगर) यांनी नगर तालुका पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली. फिर्यादी यांचा नगर बाजार समितीच्या नेप्ती कांदा मार्केट येथे कांदा विक्रीचा व्यवसाय आहे. फिर्यादी यांच्याकडून १४ मार्च २०२० ते २१ मार्च २०२० दरम्यान अमित अंकुश कापरे (साक्षी ट्रेडर्स), त्याचा भाऊ गोरक्ष उर्फ बाबू अंकुश कापरे, त्याचा मेव्हणा प्रमोद गोकुळ जगताप (सर्व रा. नागरे, ता. पुरंदर, जि. पुणे) यांनी ट्रान्सपोर्टद्वारे वेळोवेळी कांदा खरेदी केला. या कांद्याची रक्कम त्यांनी फिर्यादी यास दिली नाही. वेळोवेळी पैशाची मागणी केली असता त्यांनी फिर्यादी यांना उडवाउडवीचे उत्तरे दिली व पैसे देण्यासही नकार दिला. याप्रकरणी फसवणूक झाल्याचे निदर्शनास आल्यावर फिर्यादी यांनी पैसे मिळवण्याचा आटोकाट प्रयत्न केला. परंतु त्यांना यश आले नाही. त्यामुळे त्यांनी नगर तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. या फिर्यादीवरुन ३ जणांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सहाय्यक फौजदार रवींद्र डावखर हे करीत आहेत.

# नगरमध्ये हॉटेलच्या रुममधून क्रिकेट सामन्यावर ऑनलाईन सट्टा

**पोलिसांची कारवाई, साहित्यासह दोघांना पकडले**

नगर - नगर शहरातील तारकपूर परिसरात असलेल्या एका हॉटेलमध्ये बनावट आधारकार्ड च्या सहाय्याने रुम घेवून त्या रुममध्ये क्रिकेट सामन्यावर आणि शेअर मार्केटवर ऑनलाईन सट्टा खेळणाऱ्या दोघांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने रंगेहाथ पकडले आहे. ही कारवाई ४ ऑगस्ट रोजी सकाळी ७ वाजण्याच्या सुमारास करण्यात आली असून या कारवाईत बनावट आधारकार्डसह १७ हजार १०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या बाबतची माहिती अशी की, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांना गोपनीय माहिती मिळाली की तारकपूर परिसरातील एका हॉटेल मध्ये काही जण ऑनलाईन सट्टा खेळत आहेत. ही माहिती मिळताच त्यांनी पथकातील पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र वाघ, पोलीस अंमलदार बिरप्पा करमल, लक्ष्मण खोकले, संतोष खैरे, चालक अरुण मोरे, अर्जुन बडे यांना कारवाई साठी पाठविले. या पथकाने तात्काळ त्या हॉटेलमध्ये जावून हॉटेलच्या दुसऱ्या मजल्यावर रुम नंबर २०१ मध्ये छापा टाकला. तेथे मधुकर सखाराम येवले (रा. मुलुंड, मुंबई) व त्याचा एक साथीदार रुममध्ये मिळून आले. त्यांच्याकडील मोबाईलमध्ये पाकिस्तान व वेस्ट इंडीज यांच्यातील चालू असलेल्या टी २० क्रिकेट सामन्यावर सट्टा लावला जात असल्याचे आढळून आले. तसेच व्हॉट्सॲपवर बेटिंगसाठी वापरले जाणारे आय डी, पासवर्ड व लिंकही आढळून आल्या.

तपासादरम्यान नरसैया मोरप्पा नरसिमा (रा. सिध्दार्थनगर, मुंबई) या इसमाच्या नावाचे बनावट आधारकार्ड सुद्धा पोलिसांना आढळले. मधुकर येवले याने हे कार्ड हॉटेलमध्ये राहण्यासाठी व पोलिसांना फसवण्यासाठी तयार केल्याचे कबुल केले. पोलिसांनी दोघांकडून दोन मोबाईल फोन, कॅलक्युलेटर, वही (त्यात आठ बुकिंची नावे व आयडी पासवर्ड असलेली), पेन व बनावट आधारकार्ड असा १७ हजार १०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला.

या प्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस हवालदार बिरप्पा करमल यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरुन दहाजणांविरुद्ध भा.न्या. सं. २०२३ चे कलम ३१८(४), ३३६ (२) (३), ३४० (२), ३ (५) तसेच महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम ४ व ५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक वाघ हे करीत आहेत.

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक




# नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

## जागतिक ट्रॅफिक लाईट दिवस

आज जागतिक ट्रॅफिक लाईट दिवस जगभर पाळण्यात येतो. आमचे अहिल्यानगर शहर मात्र याला अपवाद आहे आम्ही आज कायम बंद असलेले ट्रॅफिक सिग्नल आणि ट्रॅफिक पोलिसांचा दुष्काळ असा दिवस पाळणार आहोत..

आज जागतिक ट्रॅफिक लाईट दिवस पाळला जातो.. त्यानिमित्त हा लेखन प्रपंच आहे खरा... परंतु वास्तविक आपलं शहर हे जगाच्या पाठीवर अगदी वेगळं शहर आहे.. कारण जगामध्ये जे जे उत्तम, उदात्त, उन्नत, सुरक्षित आणि सुसंस्कृत आहे त्या सगळ्याच गोष्टींचे, नियमांचे, कायद्याचे उध्दटपणे उल्लंघन करूनच वागण्यामध्ये आपल्या नगरी जनतेला आणि अधिकाऱ्यांना सुद्धा खूप मोठेपणा वाटतो.. आपलं शहर नेहमी असेच बेशिस्त आणि टपोरी ठेवण्यामध्ये याचा मोठा वाटा आहे. हीच मंडळी जेव्हा पुणे मुंबईला जातात तेव्हा शिस्तीत वागतात.. आणि नगरच्या मातीत आल्या आल्या त्यांची बुद्धिभ्रष्ट का होते हे एक रहस्यच आहे..




संपूर्ण जगाची लोकसंख्या १८६८ साली फक्त दीडशे दोनशे कोटीच्या आसपास होती.. तरीपण लंडनमध्ये त्या काळातही प्रगत असलेल्या रस्त्यांवर कधीतरी चुकून एखादी दुसरी गाडी घोडे जनावर आणि माणसं जायची तरीपण ट्रॅफिक सिग्नल ची त्यांना गरज भासू लागली.. यावरून त्यांच्या संवेदना लक्षात येऊ शकतात.. त्या काळात इलेक्ट्रिसिटी वगैरे फारशी प्रगत नसल्यामुळे गॅसवर चालणारे लाल आणि हिरवा असे दोनच लाईट त्यांनी निवडक चौकामध्ये लावले होते..

पुढे ५ ऑगस्ट १९१४ क्लॅव्हेडो ओहिओ येथे पहिला ट्रॅफिक सिग्नल लावला गेला आणि १९२४ मध्ये त्याचे इलेक्ट्रिफिकेशन झाले., विशेष म्हणजे या ट्रॅफिक सिग्नलच्या संशोधनाचे श्रेय एका वृत्तपत्र विक्रेत्याकडे जाते.. त्याचे नाव होते..... जोसेफ नाईट.. परंतु तो बिचारा गरीब असल्यामुळे पेटंट मिळवू शकला नाही.. पुढे त्याची ही कल्पना चोरून धन दांडग्यांनी पेटंट मिळवले.

भारतात कलकत्त्यामध्ये डलहौसी चौकामध्ये पहिला ट्रॅफिक सिग्नल १९२८ मधे उभारला गेला. या जवळजवळ शंभर वर्षांच्या इतिहासामध्ये आपलं ऐतिहासिक अहिल्यानगर शहर मात्र अजूनही शंभर वर्ष मागेच आहे... कारण आपल्या शहरामध्ये डीएसपी चौक या नावामध्येच त्याचे रहस्य दडलेले असल्यामुळे साहेबांना दाखवण्यासाठी तो चौक आणि अजून एक दोन चुकून चुकलेले अपवाद वगळता कागदावर असलेले एकंदर ३६ चौक असे आहेत की जिथे गंजलेले बंद ट्रॅफिक सिग्नल उभे आहेत... त्यामधील सर्किट बोर्ड आणि वायरी घुशी व उंदरांनी कुरतडून दहा वीस पिढ्या जगवल्या असतील.

हे सिग्नल उभारून जेव्हा शंभर वर्ष होतील, गंजून गंजून ते ट्रॅफिक सिग्नल जेव्हा कमरेमध्ये वाकतील ... तेव्हा कदाचित ते चालू होतील.. अशी आपल्या शहराची अवस्था आहे.. आणि विशेष म्हणजे यदा कदाचित हे ट्रॅफिक सिग्नल चालू झालेच तर ते कुणी आणि का पाळायचे? हा यक्ष प्रश्न आहेच.. त्यामुळे या जगद्गुरु व्हायला निघालेल्या भारतामधील सर्वात अग्रेसर महाराष्ट्र राज्यात सर्वात मोठा जिल्हा असलेले आणि सर्वात पुरातन ऐतिहासिक अशा आपल्या शहरात ट्रॅफिक पोलीस आणि ट्रॅफिक सिग्नल याचा आजही संपूर्ण दुष्काळ असावा, यासारखे दुसरे दुर्दैव नाही.

आजच्या या जागतिक ट्रॅफिक दिवसानिमित्त अहिल्यानगरमध्ये चौकाचौकात बंद अवस्थेत उभ्या असलेल्या ट्रॅफिक सिग्नलचा ही पिढी हयात असेपर्यंत तरी अहिल्योध्दार व्हावा, आणि या पिढीतील सर्वांना कधीतरी सगळ्या चौकातले सगळे ट्रॅफिक सिग्नल चालू आहेत.. आणि तिथे तिथे एक ट्रॅफिक पोलीस उभा आहे ..असे दृश्य दिसावे म्हणजे कावळा शिवण्यासाठी ते समाधानाने डोळे मिटायला मोकळे होतील असे वाटते.. अशा या यातनामय यातायात सदिच्छेसह शहरातील सर्व बंद ट्रॅफिक सिग्नलला मनःपूर्वक श्रद्धांजली!

**- सुहासभाई मुळे**, अध्यक्ष जागरूक नागरिक मंच

## प्रेरणादायी अक्षरधन



'मुसाफिर'-९८२२०२०६९१

### हे जीवन सुंदर आहे...फक्त तसं पहा...

धकाधकीच्या, ताणतणावाच्या अन् उगीचच स्ट्रेस घेणाऱ्या सद्गृहस्थांनो, हे जीवन फार सुंदर आहे बशर्ते त्याकडे सकारात्मकतेने, उत्कट आशेने पाहावे. प्रत्येक गोष्टीत नाविन्य आहे, आढळले तशी दृष्टी ठेवण्याचा प्रामाणिक प्रयत्न करावा.



खरं तर, हे जीवन किती सुंदर आहे, किती नाजूक आहे. त्यातील प्रत्येक क्षण खूप मौल्यवान आहे आणि तो क्षण आपण कवडीमोल भावाने विकून टाकतो. कारण हे सर्व गृहीत धरलंय आपण. आपण राग व दु:खाच्या आगीत बुडालेलो आहोत. शांत व रागावलेले थोडेसे मर्यादित.

आपण आपल्या मूडची किल्ली जगाला दिली आहे. आपल्या आतला आवाज घाबरलेला, ऐकून येणार आहे काळ खूप वेगवान आहे. त्याचा प्रत्येक टप्पा सोनेरी आहे.

बालपणापासून वृद्धापकाळापर्यंतचा हा प्रवास, त्याला कुणाचीही नजर लागू नये. आपल्या सामान्य नेहमीच्या दिवसाकडे नवीन डोळ्यांनी पाहा. यामुळे प्रत्येक क्षण, प्रत्येक क्षणन्न क्षण आठवले.

जो वर्तमानात जगतो, तो चैतन्याचे अमृत पितो. भूतकाळ व भविष्य विसरुन जा. सत्चित आनंदाची अनुभूती घ्या. यासाठी हिमालयात जाण्याची गरज नाही. गीता म्हणते, मोक्ष याच जगात मिळवायचा आहे. भल्या माणसा हे जीवन एक कर्मभूमी आहे. आत्मशक्ती हे एक शस्त्र आहे. मोह मायेचा काय उपयोग, जेव्हा हे कपडे काढायचे आहेत.

जीवनाची सहज अन् सर्वांगसुंदर अनुभूती घ्यायची असल्यास मन:पटलाची पाटी स्वच्छ, कोरी ठेवून सकारात्मकतेने राहण्याचा प्रयत्न आपल्याला सातत्यपूर्ण करावा लागेल.

छोट्या छोट्या गोष्टीत आनंद पाहावा लागेल. रजनीशही म्हणायचे सकाळी उठल्यावर सुर्याची आभा पाहणं, पक्ष्यांचं गुंजन ऐकणं, दऱ्याखोऱ्यांत फिरणं किंवा किमान ते अनुभवणं, स्वत:शीच स्वत:शी सुसंवाद करणं एकाच वाक्यात सांगायचं तर कवी मंगेश पाडगावकरांनी सांगितल्याप्रमाणे ''या जन्मावर या जगण्यावर शतदा प्रेम करावे. (आणि सर्वांगसुंदर जीवनाचा आनंद घ्यावा, द्यावा.)

# अनधिकृत केबल वायर्सचा सुळसुळाट; हाडको परिसरात अपघातांचा धोका वाढला

**मनमाड रोडवरील घटना ताजी असतानाही प्रशासनाची दुर्लक्ष; तातडीने कारवाईची मागणी**

नगर - मनमाड रोडवर घडलेल्या केबल वायरमुळे झालेल्या दुर्घटनेच्या घटनेला अवघे काही दिवस उलटले असतानाच हाडको परिसरातही अशाच धोकादायक केबल वायरच्या समस्येने डोके वर काढले आहे. महानगरपालिकेच्या लाईट पोलवर तसेच रस्त्यांवर आडवे-तिडवे पसरलेले केबल नेटवर्क नागरिकांच्या जिवाशी खेळत आहेत. याच्या विरोधात शिवसेना नगर दक्षिणचे जिल्हाध्यक्ष चंद्रकांत (काका) शेळके यांनी महानगरपालिका आयुक्तांना निवेदन देऊन कारवाईची मागणी केली आहे.



हाडको परिसरातील अनधिकृत केबल वायरमुळे अपघाताचा धोका वाढल्याने तातडीने कार्यवाही करावी, या मागणीचे निवेदन चंद्रकांत शेळके यांनी महानगरपालिका आयुक्तांना दिले.

निवेदनात नमूद केले आहे की, सिव्हील हाडको प्रभाग क्रमांक चार व पाचमध्ये काही केबल ऑपरेटरने परवानगी न घेता उघड्यावर वायर पसरवल्या आहेत. हे केबल वायर झाडांमध्ये, विजेच्या खांबांवर आणि रस्त्यांमध्ये टाकण्यात आले आहेत. नागरिकांच्या सुरक्षिततेचा विचार न करता हे सगळं केलं जात आहे. यामुळे लहान मुलं, वृद्ध आणि दुचाकीस्वारांसाठी धोका निर्माण झाला आहे.

मनमाड रोडवर घडलेली घटना अजून ताजी आहे. मात्र त्यानंतरही हाडको परिसरात काहीही कारवाई झालेली नाही, यावरून प्रशासनाचे दुर्लक्ष दिसून येते. जर तातडीने हे वायर काढण्यात आले नाहीत तर हाडको परिसरात गंभीर अपघात घडल्याशिवाय राहणार नाही, असा स्पष्ट इशाराही शेळके यांनी दिला आहे.

त्यांनी पुढे म्हटले की, शिवसेना हे प्रकरण गभीरतेने घेत असून नागरिकांच्या सुरक्षेच्या मुद्द्यावर कुठलीही तडजोड केली जाणार नाही. जर महापालिका याकडे दुर्लक्ष करेल, तर शिवसेना रस्त्यावर उतरेल.

महापालिकेने या निवेदनाची तातडीने दखल घेऊन संबंधित विभागाला आदेश देणे गरजेचे आहे, अन्यथा मनमाड रोडसारखी दुर्घटना हाडको परिसरात घडल्यास जबाबदार कोण, हा प्रश्न निर्माण होईल. प्रशासनाने यावर त्वरित उपाययोजना करणे, हीच जनतेची अपेक्षा आहे.

# मीटरमध्ये छेडछाड करून ९१ हजार रुपयांची वीज चोरी

**महावितरणच्याच्या पथकाने कारवाई करत केला गुन्हा दाखल**

नगर - घरगुती वापराच्या वीज मीटर मध्ये छेडछाड करून परसेंटेज पट्टीची वायर कट करून गेल्या वर्षभरात ९१ हजार ८२३ रुपयांची वीज चोरी करणाऱ्या विरुद्ध महावितरणच्या च्या पथकाने कारवाई करत गुन्हा दाखल केला आहे. राजेंद्र शांतीलाल बाफना (रा. अकोळनेर, ता.नगर) असे गुन्हा दाखल झालेल्याचे नाव आहे.

याबाबत महावितरणच्या सारोळा कासार शाखा कार्यालयातील कनिष्ठ अभियंता संदीप विठ्ठल बराट (वय ४२, रा. देहरे ता. नगर) यांनी फिर्याद दिली आहे. अभियंता बराट यांच्यासह कर्मचारी राहुल थोरवे, अरुण शिंदे हे २८ जुलै रोजी दुपारी ४ च्या सुमारास अकोळनेर गावात वीजचोरी शोधण्यासाठी गेले असता मयत प्रेमसुख एच. बाफना यांच्या नावावर वीजजोड असलेल्या घरात सध्या राहात असलेले त्यांचे पुतणे राजेंद्र शांतीलाल बाफना यांना ओळखपत्र दाखवत घरातील वीजजोडणी तपासली असता त्यांनी त्यांच्या घरगुती वापराच्या वीज मीटर मध्ये छेडछाड केल्याचे आढळून आले.

त्यामुळे या पथकाने सदर मीटर सील करून तपासणी साठी नगर शहरातील महावितरण कार्यालयात पाठविले. त्यानंतर २९ जुलै रोजी सकाळी ११ वाजता राजेंद्र बाफना यांचा मुलगा पियुष बाफना यांच्या समोर चाचणी कक्षात मीटरची तपासणी केली असता, मीटर मध्ये छेडछाड करून मीटर ७५.३३ टक्के स्लो केल्याचे आढळून आले. त्यामुळे बाफना यांनी मीटर मध्ये छेडछाड करून गेल्या वर्षभरात ९१ हजार ८२३ रुपयांची वीज चोरी केल्याचे समोर आले असल्याचे या फिर्यादीत म्हंटले आहे. या फिर्यादीवरून पोलिसांनी राजेंद्र बाफना यांच्याविरुद्ध भारतीय वीज कायदा २००३ च्या कलम १३५ नुसार गुन्हा दाखल केला आहे.

# फटाका व्यवसायिकाचा माल बेकायदेशीरपणे कोतवाली पोलिसांनी केला जप्त

**दि अहमदनगर फटाका व्यापारी असोसिएशनच्या वतीने जिल्हा पोलीस अधीक्षक यांना निवेदन**

नगर - फटाका व्यवसायिक रामचंद्र मुलतानी यांचा माल नुकताच कोतवाली पोलिसांनी बेकायदेशीरपणे जप्त केला म्हणून दि अहमदनगर फटाका व्यापारी असोसिएशनच्या वतीने सर्व सभासदांनी जिल्हा पोलीस अधीक्षक यांची भेट घेऊन निवेदन दिले. यावेळी असोसिएशनचे अध्यक्ष गणेश परभणे, सेक्रेटरी श्रीनिवास बोज्जा, उपाध्यक्ष सुरेश जाधव व विकास पटवेकर, ज्येष्ठ सदस्य देविदास ढवळे, शिरीष चंगेडे, अनिल टकले, निखिल परभणे, अरविंद साठे, सोमा रोकडे, सागर जाधव, रमेश बनकर, दाजी गारकर, सागर हरबा, अरविंद काळे, मयूर भापकर, संजय जंजाळे, उबेद खान, आदिनाथ दारकुंडे, संजय सुराणा, अमोल तोडकर, सुनील पोपटाणी, विजय मुनोत, राजेंद्र छल्लाणी, उमेश क्षीरसागर, सुनील आरे, गोरख खंदारे, कराळे सह इतर सदस्य उपस्थित होते

दि अहमदनगर फटाका व्यापारी असोसिएशनच्या वतीने व्यापारी सदस्य अहिल्यानगर जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रात फटाक्यांची विक्री करीत असतात व सदर फटाका माल हा वाहतुकीने अहिल्यानगर जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रात जात असतो परंतु नुकतेच कोतवाली



रामचंद्र मुलतानी यांचा माल नुकताच कोतवाली पोलिसांनी बेकायदेशीरपणे जप्त केला म्हणून दि अहमदनगर फटाका व्यापारी असोसिएशनच्या वतीने सर्व सभासदांनी जिल्हा पोलीस अधीक्षक यांची भेट घेऊन निवेदन दिले.

पोलिसांनी असोसिएशनचे ज्येष्ठ सदस्य रामचंद्र मुलतानी यांचा फटाका माल पिंपरी चिंचवड येथील ग्राहकासाठी वाहतूक केले जात असताना कारवाई करून माल जप्त केला. वास्तविक पाहता फटाका वाहतूक करण्यासाठी कोणतेही कायदेशीर परवाना लागत नाही, असा भारत सरकारचा स्फोटक पदार्थ नियम १९८३ पोटनियम ३२(५) व ७७(२) प्रमाणे फटाका वाहतूक करण्यास कोणत्याही कायदेशीर परवानगीची आवश्यकता लागत नाही. असे जीआर असताना पोलिसांनी वाहतूक परवाना नसल्याने कायदेशीर कारवाई करणे व्यापाऱ्यावर अन्यायकारक आहे. या पूर्वीही पोलीस प्रशासनातील काही मंडळी आर्थिक चिरीमिरी साठी व्यापाऱ्यांचे गाड्या अडवून त्रास दिलेला आहे व हा त्रास दिवसेंदिवस वाढत असल्यामुळे फटाका व्यापाऱ्यांनी एकत्र येऊन असोसिएशन च्या वतीने पोलीस प्रशासनाने यापुढे व्यापाऱ्यांवर अशा पद्धतीने काही कारवाई करू नये म्हणून जिल्हा पोलीस अधीक्षक यांची समक्ष भेट घेऊन निवेदन देण्यात आले. त्याची प्रत जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांना देण्यात आली आहे. या वेळी जिल्हा पोलीस अधीक्षक यांनी या पुढे व्यापाऱ्यांना त्रास होणार नाही असे आश्वासन दिले व व्यापाऱ्यांनीही सर्व नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याची ताकीद दिली.

## किरण बेरड यांचे अल्प आजाराने निधन



नगर - दरेवाडी येथील रहिवासी किरण बापू बेरड (वय ३३) यांचे ५ ऑगस्ट रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर दरेवाडी येथील अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे आई-वडील, बहीण, मेहुणे असा परिवार आहे.


## सुरेश खाबिया यांचे अल्प आजाराने निधन

नगर - धार्मिक परीक्षा बोर्ड परिसरातील अतिथी भवन मागील आनंद दर्शन अपार्टमेंट मधील रहिवासी सुरेश माणकचंद खाबिया (वय ६२) यांचे ५ ऑगस्ट रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे १ मुलगा, १ मुलगी, १ भाऊ, भावजय, जावई असा परिवार आहे. सागर खाबिया यांचे ते वडील होत.



## डॉ.भिकचंद ठोळे यांचे वृद्धापकाळाने निधन

श्रीरामपूर - येथील जुन्या बर्फ कारखाना शेजारील जुन्या पिढीतील वैद्य डॉ.भिकचंद दुलीचंद ठोळे (वय ९४) यांचे ४ ऑगस्ट रोजी वृद्धापकाळाने निधन झाले.



त्यांच्या पश्चात पत्नी, चार मुले, सुना, पुतणे, नातवंडे असा परिवार आहे. सेवानिवृत्त पं.स.अभियंता नंदलाल ठोळे, सुशिल ठोळे, सेवानिवृत्त बीएसएनएल अभियंता मनोज ठोळे, निखिल जनरल स्टोअरचे मालक दिनेश ठोळे यांचे वडील, चंपालाल, नेमिचंद व दिलीप ठोळे यांचे चुलते, निखिल व संयम ठोळे यांचे आजोबा होत.

## मध्यरात्री संशयितरित्या फिरणाऱ्या तिघा जणांना पोलिसांनी पकडले

नगर - मध्यरात्री अंधाराचा फायदा घेऊन तोंडाला रुमाल बांधून संशयितरित्या फिरणाऱ्या तीन परप्रांतीयांना नगर तालुका पोलिसांनी पकडले आहे. ही कारवाई चिचोंडी पाटील ते भातोडी जाणाऱ्या रोडवर मारुती वाडी परिसरात संदीप काळे यांच्या घराजवळ ४ ऑगस्ट रोजी पहाटे सव्वाचार वाजण्याच्या सुमारास केली.

नगर तालुका पोलीस चिचोंडी पाटील शिवारात रात्री गस्त करीत असताना चिचोंडी पाटील ते भातोडी जाणाऱ्या रोडवर मारुती वाडी परिसरात संदीप रघुनाथ काळे यांच्या घराच्या जवळ अंधारात तोंडाला रुमाल बांधून संशयितरित्या दबा धरुन बसलेले तिघे जण आढळून आले. पोलिसांनी देवानंद मगरराम कुमार (वय २८,रा. शिरपूर, जिल्हा गाजीपुर, उत्तर प्रदेश), चंदन कुमार गुराराम ( वय ३०, रा. शिरपूर, गाजीपुर, उत्तर प्रदेश), विनय शैलेंद्र भारद्वाज (वय २५, रा. जयपूर, उत्तर प्रदेश) यांना पकडले. त्यांना इतक्या रात्री इकडे काय करता अशी विचारणा केली असता त्यांनी समाधानकारक उत्तरे दिली नाही. यावरुन हे तिघे काहीतरी गैरकृत्य करण्याच्या उद्देशाने फिरत असल्याची पोलिसांची खात्री झाल्याने, पोलिसांनी तिघांना ताब्यात घेतले.

याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात पोलीस कॉन्स्टेबल पोपट गिते यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन तीन संशयितांविरुद्ध महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ चे कलम १२२ प्रमाणे गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस नाईक लोखंडे हे करीत आहेत.

# महात्मा फुले यांच्या नावाची तोडफोड करणाऱ्या समाजकंटकांवर करावी अन्यथा शहरात 'चक्काजाम आंदोलन' करण्याचा इशारा

**घटनेचा फुले ब्रिगेडच्या वतीने निषेध, अप्पर पोलीस अधीक्षकांना निवेदन**

नगर - राशीन (ता. कर्जत) येथे क्रांतीसुर्य महात्मा फुले यांच्या नावाच्या पाट्यांची व सर्कली तोडफोड करुन विटंबना केल्याचा निषेध फुले ब्रिगेडच्या वतीने शहरात करण्यात आले. तर या प्रकरणातील समाजकंटकांवर कठोर कारवाई करण्याच्या मागणीचे निवेदन अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे यांना देण्यात आले.



महात्मा फुले यांच्या नावाची तोडफोड करणाऱ्या समाजकंटकांवर करा या मागणीचे निवेदन फुले ब्रिगेडच्या वतीने अपर पोलिस अधीक्षक वैभव कलुबर्मे यांना देण्यात आले.

याप्रसंगी शहराध्यक्ष दीपक खेडकर, राष्ट्रवादीचे माजी शहर जिल्हाध्यक्ष प्रा. माणिक विधाते, राष्ट्रवादी ओबीसी सेलचे अमित खामकर, किरण जावळे, विक्रांत शिरसाठ, शुभम दळवी, निखिल ताठे, आशिष भगत, विक्रम बोरुडे, सुरज उमाप, सुरेंद्र सिंग, अनुराग पडोळे, प्रकाश वारमोडे, ब्रिजेश ताठे, महेश सुडके, किरण पंधाडे, संकेत लोंढे, संकेत खरपुडे, प्रसाद बनकर, आशिष भगत, ऋषीकेश ताठे, संतोष हजारे, विलास शिंदे, वसंत गाडगे, रेणुका पुंड, रमेश बनकर, विकास पटेकर, महेश गाडे आदींसह युवक उपस्थित होते.

कर्जत तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीनुसार क्रांतीसुर्य महात्मा फुले यांचे नाव व चौक सुशोभीकरण व भगवा झेंडा असे ठरले असताना सदर सर्कलचे काम पूर्ण झाल्यानंतर चौकाच्या नावाच्या पाट्या लावण्यात आल्या होत्या. तेथे अचानक शंभर ते दोनशे लोकांच्या जमावाने एकत्र येऊन क्रांती सूर्य महात्मा फुले यांच्या नावाच्या पाट्या काढल्या व त्याची तोडफोड करण्यात आल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. या घटनेतील समाजकंटकांवर पोलीस प्रशासनाने कठोर कारवाई करावी. अन्यथा शहरात चक्काजाम आंदोलन करण्याचा इशारा फुले ब्रिगेडच्या वतीने दीपक खेडकर यांनी दिला आहे.



माजी जिल्हा परिषद सदस्य संदेश कार्ले यांच्यावर दाखल करण्यात आलेला ट्रॉसिटीचा खोटा गुन्हा तातडीने रद्द करावा या मागणीचे निवेदन पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांना देताना घोसपुरी ग्रामस्थांसह शिवसनेचे पदाधिकारी.

## मोटारसायकलची चोरी

नगर - माळीवाडा येथील कौठीची तालीम परिसरात घरासमोर रस्त्याच्या कडेला हॅण्डेल लॉक करुन लावलेली होंडा कंपनीची शाईन मोटारसायकल (क्र. एम एच १६ सी बी ७७९२) अज्ञात चोरट्याने चोरुन नेल्याची घटना ३ ऑगस्टला रात्री घडली.

या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात ऋषीकेश संजय चाफे (वय ३५, रा. माळीवाडा) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरद्ध चोरीचा गुन्हा दाखल केला, अधिक तपास कोतवाली पोलीस करीत आहेत.

पीव्हीसी कारपेट, उडन स्ट्रीप-फ्लोरिंग, वॉलपेपर, वेलवेट कारपेट, गालिचा, रोमन-रोलर- व्हर्टिकल्स - क्लॉथ कर्टन्स व कर्टन्स फिटिंग, सोफा व सोफा मटेरियल,मॅट, मॅटिंग, रबर मॅट, सॉफ्ट हार्ड मॅट, ग्रीन ग्रास, हिरवी जाळी, मच्छर जाळी, प्लास्टिक मॅट-चटई, कुशन्स-पिलोज, बेडशीट, ब्लँकेट, सोफा कव्हर्स, योग मॅट, क्लिनिंग मटेरियल

गुलाबचंद कारपेटवाला
खिस्तगल्ली, जुना कापड बाजार मागे, अहमदनगर.
मो. ९४२२३३९४६०,९४२२३३९४४२,९४२२४५४००५

# गृहिणी

## आरोग्य

* रक्तातील साखर नियंत्रित राखण्याचे काम बोर करते. अ जीवनसत्व असल्यामुळे नियमित बोर खाल्ल्यास पचनशक्ती सुधारते. बोर वजन कमी करण्यासही मदत करते. त्वचेचे तारुण्य टिकवण्यासाठी या फळाची मदत होते. एक चमचा बोराचा रस आणि काळी मिरी याचे सेवन केल्यास सर्दीपासून बचाव होतो. बोर खाल्ल्याने प्रतिकारशक्ती वाढते. हे फळ खाल्ल्यास ताण हलका होतो. यात भरपूर प्रमाणात क जीवनसत्व आहे. यात फॉस्फरसचे प्रमाण अधिक असल्याने हाडे आणि दातांच्या मजबुतीसाठी हे उत्तम आहे.

* ज्यांना शुगरचा त्रास असतो त्यांनी कच्च्या पपईचे सेवन करून रक्तात शर्करेच्या मात्रेला कमी करू शकता. यामुळे शरीरात इंसुलिनची मात्रा वाढते. पपई पोटाशी निगडित समस्या दूर करते आणि शरीरातून विषारी पदार्थ बाहेर काढते. मात्र गर्भवती महिलेस पपई खायला देऊ नये.

* सकाळी उठल्यानंतर पाणी पिणे खूप फायदेशीर मानले जाते, जर तुम्ही असे केले नाही तर तुम्ही सर्वात मोठी चूक करता आहात. कारण पाणी शरीरातील विषारी पदार्थ बाहेर टाकण्यापासून कॅलरी बर्न करण्यास मदत करते. पाणी न पिल्याने चयापचयाची समस्या निर्माण होऊ शकते आणि तुम्ही लठ्ठपणाचे शिकार होऊ शकता. म्हणूनच दिवसाची सुरुवात एक ग्लास पाण्याने करणे चांगले मानले जाते.

## पाककला

### बटाट्याचे शंकरपाळे

**साहित्य** - २ वाट्या उकडलेल्या बटाट्याचा लगदा, सव्वा वाटी मैदा, १ टी स्पून लाल तिखट, १ टी स्पून जिरेपूड, पाव टी स्पून हळद, तीळ भाजून गार केलेले पाव वाटी, चवीप्रमाणे मीठ, तळण्यासाठी तेल.

**कृती** - बटाटे उकडून किसावेत व मळून घ्यावे. अर्धी वाटी पाणी गरम करून त्यात हळद, मीठ, तीळ, जिरेपूड, तिखट घालून उकळावे. पाण्यातच दोन टी स्पून तेल घालावे. पाण्याला चांगली उकळी आल्यानंतर त्यात बटाट्याचा लगदा मिक्स करावा व परातीत ओतून मिश्रण थोडे गार करून त्यात मैदा मिक्स करावा व घट्टसर गोळा करून पोळपाटाला तेलाचा हात लावून पिठाची पोळी लाटून कातण्याने शंकरपाळीचे आकार कापावेत व तेलात खुसखुशीत तळावेत. भाजीत घातलेल्या मसाल्यामुळे भाजीला वेगळीच सुंदर चव येते.

## सौंदर्य

* डोळ्याच्या खालील काळे डाग घालवण्यासाठी बदामाचे थोडे तेल व केळ्याच्या कुस्करलेला गर एकत्र करून नियमित लावावे.

* स्नान करताना केसांत थोडेसे व्हिनेगर टाका व त्वरित धुवा. यामुळे केसांना चमक येईल आणि केसांचा रंग जास्त गडद होईल.

## सल्ला

रात्री मुल बिछाना ओला करत असतील तर त्यांना झोपाच्या आधी थोडा मध चाटवून लघवी करायला लावा.

## वास्तू

* मिठाचे खडे जर ईशान्य दिशेला ठेवल्यास घरातील नकारात्मक उर्जा निघून जाते. शौचालय चुकीच्या जागी बांधले असल्यास त्याचे दोषही ईशान्येला ठेवलेल्या मिठामुळे नष्ट होतात.

* आपल्या घराच्या दरवाजावर शुभचिन्हे म्हणजे स्वस्तिक, ॐ, गणपती, कुबेर यांची चित्रे लावावी. त्यामुळे बाहेरील अमानवी शक्तींपासून वास्तूसहीत सर्व कुटुंबियांचे रक्षण होते. देवघरात तुटक्या-फुटक्या वस्तू ठेवू नयेत. देवघराच्या वरती-खाली काहीही सामान ठेवू नये.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

बुधवार, दि. ६ ऑगस्ट २०२५

**प्रदोष, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, श्रावण शुक्लपक्ष, मूळ १३।००, सूर्योदय ०६ वा. ३१ मि. सूर्यास्त ०५ वा. ३२ मि.**

## राशिभविष्य

**मेष** : नोकरदार व्यक्तींसाठी स्थिती अनुकूल राहील. राजकीय कार्ये पूर्ण होतील. संततीसौख्य लाभेल. दिवस आनंदात जाईल.

**वृषभ** : लेखन कार्यातील अडचणी दूर होतील. अपूर्ण राहिलेली कामे पूर्ण होण्यासाठी चांगला काळ आहे.

**मिथुन** : आरोग्य बरे राहील. सर्जनशील व्यक्तींना वाव मिळेल. मागील उधारी उसनवारी वसूल होईल.

**कर्क** : मानसिक स्थिरता वाढेल. मान-सन्मानात वाढ होईल. पुर्वसुकृत फळास येऊन अर्धवट राहिलेली सरकारी कामे पूर्ण होतील.

**सिंह** : ध्येय साध्य करण्यात पूर्ण यश मिळेल. जुन्या मित्र-मैत्रिणींची भेट होईल. वाहने जपून चालवा.

**कन्या** : आरोग्य उत्तम राहील. काहीकाळ कठीण गेल्यानंतर यश मिळेल. नोकरीत चांगला काळ राहिल. पदोन्नती व पगारवाढ होणार.

**तूळ** : आपण पूर्वीपासून आपल्या मनात असलेल्या योजनेबद्दल अतिउत्साही असाल.

**वृश्चिक** : आपल्या आवडी-निवडीप्रमाणे कार्य करण्यासाठी आजचा दिवस सर्वात उत्तम आहे.

**धनु** : दिवस संमिश्र जाईल. आर्थिक नुकसानीची शक्यता आहे. अडीअडचणीत असलेल्यांना मदत केल्यास तुमचे काम लवकर पूर्ण होईल.

**मकर** : जर आपणास आपले निवासस्थान बदलण्याची इच्छा असेल तर आजचा दिवस उत्तम आहे.


**कुंभ** : व्यापाऱ्यांसाठी परिस्थिती साधारण. जोडीदाराशी वादविवाद टाळा. भातृचिंता सतावेल.

**मीन** : आपल्या कार्यातील अडचणी दूर होतील. अधिकाऱ्यांकडून कामे करवू शकाल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## शब्दगंध क्र. ७२३६

सौ.शैलजा कुलकर्णी



शब्दगंध क्र. ७२३५ चे उत्तर



**आडवे शब्द :-** १) भवानी देवी असलेले उस्मानाबाद जिल्ह्यातील गाव ४) तपास; शोध; ठावठिकाणा; पत्ता ६) न झोपता रात्र काढणे ८) अयोध्येच्या राजा व त्याचा जप ११) घाण; विष्ठा १२) 'शोले' चित्रपटातील अमजदखानचे नाव १५) उंटाच्या पाठीवरचा उंचवटा; भिस्त १७) हेर; खंदक; हाळ १८) मंदिर वगैरेचा सर्वोच्च भाग; शिखर २०) पर्वत; डाग; वस्तू २१) एक मराठी आडनाव; प्रसिद्ध दिवंगत कवी - बा. भ. ++++ २३) शिकार २४) सूट; डिस्काउंट

**उभे शब्द :-** १) अभंगांसाठी प्रसिद्ध असलेले प्रसिद्ध मराठी संत २) जिल्ह्याचे ठिकाण असलेले मराठवाड्यातील एक शहर ३) परवानगीने काढलेली सुट्टी ४) चोप; ताडन ५) भक्त किंवा सेवक यांचा समुदाय ७) एक शेंगभाजी ९) ओकारी येईल असे वाटणे किंवा शरीराची तशी स्थिती १०) पाण्यात राहणारा एक हिंस्र प्राणी; मकर; नक्र १३) शिंपडणे; सडा; शेतीला पाणी देण्याची क्रिया १४) अगदी गोल; वाटोळा १६) समर्थ रामदासांचा प्रसिद्ध ग्रंथ १८) पिकांवर पडणारा एक रोग १९) जिज्ञासू; शोधक २२) ध्वनी; आवाज; नाद; साउंड

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : तुमचे ध्येय सतत तुमच्या नजरेसमोर ठेवणे हेच ध्येयसफलतेचे रहस्य आहे. **- डिझरेली.**

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### कच्चे मांस खाल्ल्यास काय होते?

आदिमानव शिकार करायचा. सुरुवातीच्या काळात तो कच्चे मांस खायचा. आजही जगात काही भागात अत्यंत मागासलेल्या अशा आदिवासी जमातींमध्ये कच्चे मांस खाण्याची प्रथा आढळून येते. जसजशी प्रगती होत गेली त्यानुसार मानव चवीचवीने, विविध प्रकारे शिजवून/भाजून मांस खाऊ लागला. आज तर मांसाचे पदार्थ बहुतांश सर्वच हॉटेलांमध्ये उपलब्ध असतात व खवैय्ये या पदार्थांवर हात मारताना दिसतात. कच्चे मांस खाल्ल्यास अनेक दुष्परिणाम होऊ शकतात. एक म्हणजे शिजवणे-भाजणे यामुळे अन्न पचायला सोपे होते. मसाल्यांच्या वापरामुळे ते चविष्ट बनते. अर्थात याहून महत्त्वाचे म्हणजे कच्चे मांस खाल्ल्याने आपल्याला अनेक आजार होऊ शकतात. कच्चे मांस खाल्ल्याने आपल्याला टेपवर्म किंवा टेपकृमींचा संसर्ग होऊ शकतो. टिनिया सोलीयम, टिनीया सजायनाटा, ट्रिचिनेलीस स्पायरॅलीस आणि फॅस्कीओला हेपॅटीका अशी या टेपकृमींची नावे आहेत. याखेरीज कच्चे मांस खाल्ल्याने अँथ्रॅक्स, ॲक्टीनोमायकोसीस (एक बुरशीजन्य रोग), प्राण्यांचा क्षयरोग तसेच अन्नविषबाधा इ. रोगही आपल्याला होऊ शकतात. आजकाल मुद्दाम तर कच्चे मांस कोणी खाणार नाही. पण हॉटेलमध्ये किंवा खूप लोक एकत्र जेवत असतील तशा ठिकाणी (खानावळ, लग्नाच्या मेजवान्या वगैरे) घाईगर्दीने मांस शिजवले जाण्याची शक्यता असते किंवा मोठ्या प्रमाणात पदार्थ बनवण्यासाठी रोगट जनावरांचे मांस वापरले जाण्याची शक्यता असते. त्यामुळे मांस खाणाऱ्यांनी त्यांना अशा प्रकारे त्रास होणार नाही याची खात्री करणे आवश्यक ठरते. सर्वात चांगला उपाय म्हणजे एकतर घरीच मांसाहार करणे आणि अनोळखी किंवा खात्री नसेल त्या ठिकाणी मांसाहार टाळणे.

### काळ-वेळ तरी पहा

आंघोळ करण्यासाठी म्हणून एक मुलगा तलावावर उतरून आंघोळ करीत असताना नकळत खोल पाण्यात गेल्याने गटांगळ्या खाऊ लागला. आता आपण बुडून मरणार, याची जाणीव होताच तो

''वाचवा, वाचवा'' असे ओरडू लागला.

त्याचा आवाज ऐकून जवळून जात असलेला एक माणूस तेथे येऊन काठावर उभा राहिला. त्याला पाहून '' काका मला वाचवा. पाण्यातून बाहेर काढा, नाहीतर बुडून मरेन मी.'' अशी विनवणी करू लागला.

हे ऐकून तो माणूस म्हणाला, ''अरे तुम्ही अलीकडची मुलं फार शेफारून गेलात. मोठ्या माणसांचे न ऐकता मनमानी करता आणि संकटात सापडताच विनवणी करू लागता. तुमचा मुर्खपणाच याला कारणीभूत आहे यात तिळमात्र शंका नाही.''

त्याचे हे वेळकाढू बोलणे ऐकून मुलगा म्हणाला,

''अहो काका, आधी मला जिवंत तरी वर काढा आणि नंतर काय उपदेश करायचा तो करा. वाटल्यास, मुस्कटात मारा. मी तोंडातून ब्रदेखील काढणार नाही. पण आधी काढा मला वर.''

**तात्पर्य** : उपदेश नेहमी प्रसंगावधान पाहून द्यावयाचा असतो.

## जीवन का अमृत (भाग १)



कबीर साहिब को 'Father of Sant-Mat' ('संत-मत का पिता') कहा जाता है। संत-मत सृष्टि के शुरुआत से ही है। प्रभुने जब अपनी मौज में आकर काल को वरदान दिये, तो आत्माओं को पुनः अपने से मिलाने के लिए एक रास्ता बना दिया और वह यह है कि किसी पूर्ण महापुरुष की सोहबत करके और उनके सत्संग के द्वारा, उनसे नामदान लेकर आत्मा अपने निजधाम पहुँच सकती है, ८४ लाख जियाजून के चक्कर से निकल सकती है। कबीर साहिब के आने पर संत-मत की तालीम बहुत तेजी से आम लोगों तक पहुँची। कबीर साहिब ने तो इस हद तक कहा है अगर प्रभु हमसे नाराज हो जाता है, कोई चिन्ता की बात नहीं, क्योंकि गुरु का दरवाजा हमारे लिए खुला है, मगर गुरु नाराज हो जाए, तो हमारे लिए कहीं भी ठिकाना नहीं है। गुरु की महिमा इसीलिए

### गुरू और परमात्मा

की गई है कि हम अंधकार में रह रहे है। अंधकार में जब हम हाथ पैर मारते हैं, तो गलत रास्ते पर चलना शुरू कर देते हैं। लेकिन जब हमें अंधकार में रोशनी की किरण दिखाई दे जाये तो! गुरु वही है जो हमें अंधकार से प्रकाश की ओर ले जाए। जब हमें रोशनी दिखाई दे, तो हम अपनी मंजिल पर पहुँच सकते हैं। प्रभु ने इंसान को सत्य और असत्य का निर्णय करने की क्षमता दी है। मानव चोले को 'Roof and Crown of all Creation' (सर्वश्रेष्ठ योनि) कहा गया है। गुरु की महिमा के बारे में ही हमें सहजोबाई जी समझा रही हैं। परमात्मा power-house (बिजलीघर) है। लेकिन जो power (बिजली) हम तक पहुँचती है वह गुरु से मिलती है, क्योंकि गुरु power-house (बिजली घर) से जुड़ा है। हमें इस बात से कोई फर्क नहीं पड़ता कि powerhouse कहाँ स्थित है। हमें सिर्फ switch-on (बटन दबा) करके रोशनी प्राप्त करने से मतलब है। सहजोबाई जी फ़रमा रही हैं हरि किरपा जो होय तो, नाहीं होय तो नाहिं ।। अगर प्रभु की कृपा हो तो बहुत अच्छी बात है, अगर नहीं होती तो भी कोई बात नहीं।

यदि गुरु कृपा न हुई, तो हम बुद्धि रूपी अंधकार यानी अपरा-विद्या में ही लगे रहेंगे और परा-विद्या की ओर नहीं जायेंगे। यदि किसी महापुरुष की छत्र-छाया में हम नहीं पहुँचते, तो हमारी जिंदगी व्यर्थ हो जाती है। सहजोबाई जी ने इस शब्द में तुलनात्मक आधार पर यह समझाया है कि प्रभु ने हमारे साथ क्या किया है और गुरु हमारे लिए क्या करता है। उन्होंने यह नहीं कहा कि गुरु परमात्मा से बड़ा है, बल्कि यह समझाने की कोशिश की है कि हम क्या हैं, गुरु क्या है, उसका कार्य क्या है,और परमात्मा क्या है।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

जब हम समझ चुके हैं कि हम वास्तव में प्रेममय प्राणी हैं और यह भी कि हमारे द्वारा प्राप्त की गई अन्य प्रवत्तियाँ हमारे संबंध में सचाई की विकतियाँ हैं, कि हम ईश्वर के अधीन, आत्माओं के परिवार का एक हिस्सा है, वह ईश्वर जो चिरंतन रूप से उस सत्य की ऊर्जा से भरा रहता है, जिसे हमने खो दिया है और यह कि उस सत्य को पुनः प्राप्त करने का यही समय है। जब हम अपने हृदय में महसूस करते हैं कि यही है, जो हम हैं और हम जिसके हैं तथा हम जिसे अपने जीवन में अब पुनः प्राप्त करने की इच्छा रखते हैं, ऐसा प्रतीत होता है, मानो यह पहले ही हो चुका हो। तथापि यह एक विचार या एक समझ से कहीं अधिक होना चाहिए। इसे गहराई से महसूस किया जाना जरूरी है, क्योंकि अनुभव ही परिवर्तन है। बिना प्रयास के, जब हम बार-बार अपने देवत्व की जानकारी में लौटते हैं, यह हमारे जीवन में पुनः प्रवेश कर जाता है। याद करते रहना और फिर से भुलावे में न चले जाना ही एकमात्र प्रयास है।

'स्मरण' का यह अभ्यास और योग का

### आज्ञा चक्र

अत्यधिक प्रभावशाली अनुभव, जो इससे बढ़ता है, न केवल शारीरिक मस्तिष्क, बल्कि उस सूक्ष्म ऊर्जा क्षेत्र को भी बदल देता है, जिसके अंदर हम रहते हैं, जो एक ऐसा क्षेत्र है, जिसका फैलाव मस्तिष्क के बहुत आगे तक जाता है। इस प्रकार अन्य आत्माएँ बहुत दूर से प्रकाश ग्रहण करती हैं। वास्तव में, यह एक अन्योन्य अर्थात् पारस्परिक प्रभाव है। हम अपनी चेतना को जितना कम बुद्धि आधारित होने देते हैं, हमारा मन उतना ही अधिक व्यापक और दिव्य हो जाता है। हम जितना कम सोचते हैं, उतना ही अधिक हम प्रेम करते हैं।

इसका अर्थ यह नहीं है कि हम बेदिमाग या मूर्ख हो जाते हैं। वस्तुतः यह स्थिति ऐसी होती है, जैसे स्मरण-बुद्धि से काम करनेवाले तारों को नए कार्यक्रमानुसार पुनः जोड़ रहा हो, ताकि यह हमारे अस्तित्व के उच्चतर उद्देश्यों को पूरा कर सके। स्मरण काया, मन, आत्मा और परमात्मा के बीच एक सेतु बनाने का काम करता है।

प्रेम जब हमारे अस्तित्व के हर पहलू का नवीकरण करता है, ऐसा लगता है, मानो ईश्वरीय उद्देश्य हमारे क्रियाकलापों को प्रेरित करता है, न कि दैहिक चेतना से संबद्ध संकीर्ण स्वार्थ को। कार्य करते रहे और दूसरों से संपर्क करते समय हम आध्यात्मिक तथा प्रेमपूर्ण भावनाएँ रखते हैं। फिर ऐसा नहीं लगता है, जैसे हम कुछ कर रहे हैं, बल्कि कुछ-कुछ ऐसा महसूस होता है कि ईश्वर का प्रेम ही सबकुछ करा रहा है।

दूसरों के प्रति दायित्व या बंधन की किसी भावना से हम जितने अधिक मुक्त रहते हैं, उतनी अधिक यह भावना मन में आती है कि परमपिता ने हमें अपने प्रेम के बंधन में इतनी मजबूती से बाँध दिया है कि अलग होने की अब कोई गुंजाइश ही नहीं है। वही हमें बताता है कि हमें क्या करना चाहिए और जब वह हमारा सखा बनकर हमारे साथ रहता है, हमारी भूमिकाएँ सहज ही तथा स्वतः प्रकट होने लगती हैं।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

आजोबा : सूनबाई का आराडतीयास पोरावर....
सूनबाई : बघा ना मामांजी बंडू नुसतच कोलगेट खातोय...
आजोबा : बंडू नुसत कोलगेट खायाच नसत, चपाती संग खायाच असत...

## करूया स्पर्धा परिक्षांची तयारी

* भारतीय अंतराळ संशोधनाचे जनक?

- डॉ. विक्रम साराभाई

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# काय खावे?

## मोहरी

३) संधिवात, आमवातामध्ये सांधेदुखीचा त्रास होऊन सूज आलेली असेल, तर सर्व अंगाला मोहरीच्या तेलाने मालीश करावे.

४) रुग्णांनी घेतलेले विष शरीराबाहेर काढण्यासाठी पाच ग्रॅम वाटलेली मोहरी आणि पाच ग्रॅम मीठ गरम पाण्यात घालून प्यायला दिल्यास उलट्या होऊन आतील विष बाहेर पडते.

५) थंडीताप या आजारामध्ये ताप जाऊन जेव्हा थंडी भरून येते, तेव्हा मोहरीच्या तेलाने हलकेसे मालीश करावे किंवा मोहरीचा लेप शरीरावर लावल्यास लगेचच थंडी कमी होऊन रुग्णास आराम दायी वाटते.

६) संधिवात, स्नायूदुखी, अंगदुखी, पोटदुखी, सायटिका, कंबरदुखी, गुडघेदुखी, शीर आखडणे या विकारांवर मोहरीच्या तेलाने मसाज करावा. तसेच मोहरीच्या पानांची भाजी करून खावी.

७) भूक मंद झाली असेल व अपचनाची तक्रार जाणवत असेल, तर मोहरीच्या पानांचा स्वरस दोन दोन चमचे तीन वेळा घ्यावा.

८) मोहरीच्या पिठात तूप व मध मिसळून त्याचा लेप जखमेवर लावल्यास जखमेमधील जंतुसंसर्ग कमी होऊन जखम लवकर भरून येते.

९) मोहरीचे पीठ तुपात कालवून रांजणवाडीवर लेप लावल्यास रांजणवाडी त्वरित बरी होते. फक्त हा लेप लावताना तो डोळ्यांत जाणार नाही, याची काळजी घ्यावी.

१०) एखादा रुग्ण मूर्छेमध्ये, बेशुद्ध अवस्थेत असेल, तर मोहरीचे चिमूटभर पीठ नाकात फुकरले असता रुग्ण शुद्धीवर येतो.

११) सर्दी-खोकल्याचा त्रास जाणवत असेल, तर अर्धा चमचा मोहरी मधात कालवून सकाळ-संध्याकाळ चाटण केल्यास सर्दी बरी होऊन खोकला कमी होतो.

१२) उलट्या बंद होत नसतील, तर अशा वेळी मोहरी पाण्यात वाटून त्याचा लेप पोटावर लावावा. याने त्वरित उलट्या होणे बंद होते.

**सावधानता :** मोहरी गुणाने अतिशय उष्ण असल्याने तिचा अति प्रमाणात उपयोग केल्यास आमाशय व आतड्यांचे नुकसान होण्याची शक्यता असते. म्हणून तिचा मसाल्यात वापर योग्य प्रमाणातच करावा. मोहरीचे तेल त्वचेवर लावल्यास काही जणांना त्वचा लाल होऊन फोड येतात. म्हणून प्रथम वेळी मोहरीचे तेल शरीरावर लावताना सुरुवातीला थोड्याच भागावर लावून पाहावे. जर फोड आले, तर त्या तेलाने मसाज करू नये.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# भारतीय संगीतामध्ये आत्मिकशुद्धतेचीही क्षमता

**कल्याण मुरकुटे यांचे प्रतिपादन; भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलमध्ये रंगली संगीत सभा, विद्यार्थ्यांनी सादर केले विविध रागाचे सादरीकरण**

नगर – भारतीय संगीत जगातील सर्वश्रेष्ठ संगीत आहे. या संगीतामध्ये आत्मिकशुद्धतेचीही क्षमता आहे. अहमदनगर एज्युकेशन सोसायटी संचलित भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलमध्ये सन २०१९ मध्ये म्युझिकल अॅकॅडमीची स्थापना झाली. ती अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालयाशी संलग्न आहे. ही अॅकॅडमी विद्यार्थ्यांना केवल अभिजात शास्त्रीय संगीतचे सखोल आणि शिस्तबद्ध शिक्षण देत नाही, तर त्यांच्या वादन कलेत आणि आत्मिक शुद्धतेतही भर घालत असल्याचे प्रतिपादन संगीत शिक्षक कल्याण मुरकुटे यांनी केले.



अहमदनगर एज्युकेशन सोसायटी संचलित भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलमध्ये विशेष संगीत सभेचे आयोजन करण्यात आले होते.

अहमदनगर एज्युकेशन सोसायटी संचलित भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलमध्ये विशेष संगीत सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून संगीत शिक्षक मुरकुटे हे बोलत होते. विद्यालयाचे प्राचार्य उल्हास दुगड हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. दीप प्रज्वलाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. संगीत विभाग प्रमुख परशुराम मुळे यांनी प्रास्तावित केले. पाहुण्यांचा परिचय कु. राजनंदिनी जाधव हिने करून दिला.

भारतीय संगीत ऐकल्याने आपल्या मनावरील ताण हलका होतो. मन प्रसन्न होते. भारतीय संगीत व पाश्चात्त्य संगीत यामधील फरक कल्याण मुरकुटे यांनी प्रत्यक्ष आपल्या गायनातून मुलांना करून दिला. यावेळी विद्यार्थ्यांना संगीत क्षेत्रातील रागाबद्दल माहिती देण्यात आली. विद्यार्थी कौशिक नातू, आरोही अनारसे, श्रुतिका दरेकर, गौरव भुकन यांनी अनुक्रमे राग बागेश्री, राग काफी, केदार, पुरिया धनश्री यांचे सादरीकरण अतिशय सुंदर रित्या करून उपस्थितांची मने जिंकली. यावेळी हार्मोनियमवर साथ परशुराम मुळे तर तबल्याची साथ विकास साबळे, तानपुरा साथ प्राची पवार, व श्रेया पांडव यांनी दिली.

या कार्यक्रमाप्रसंगी ह.भ.प. रामचंद्र महाराज दरेकर, लक्ष्मण महाराज शास्त्री, संतोष दाणे, पवन नाईक, राम शिंदे, संतोष कुलट, शैला शिवगुंडे, विद्यालयाचे उपप्राचार्य कैलास साबळे, पर्यवेक्षक बाळासाहेब व्हावळ, कल्पना पाठक, वैभव कुलकर्णी आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. अक्षरा फुलसौंदर हिने केले. अध्यापिका शितल डिंमळे यांनी आभार मानले.

## इंदिरानगर सेवावस्ती येथे बोल फाउंडेशनतर्फे छत्र्यांचे वाटप



भिंगार येथील इंदिरानगर सेवावस्तीत नुकतीच पावसाळ निमित्त गरजू, गरीब व वंचित कुटुंबांना ११० छत्र्या व ४० शालेय विद्यार्थ्यांना रेनकोटचे वाटप ब्रेड ऑफ लाईफ (बोल) फाउंडेशनतर्फे करण्यात आले.

नगर – भिंगार येथील इंदिरानगर सेवावस्तीत नुकतीच पावसाळ निमित्त गरजू, गरीब व वंचित कुटुंबांना ११० छत्र्या व ४० शालेय विद्यार्थ्यांना रेनकोटचे वाटप ब्रेड ऑफ लाईफ (बोल) फाउंडेशन तर्फे करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात फाउंडेशनचे संस्थापक गौरव पाटोळे यांनी या उपक्रमामागचा उद्देश सांगून केली. त्यांच्या हस्ते रेनकोट व छत्र्यांचे वाटप करण्यात आले. मास्टरकार्ड या बँकिंग संस्थेने छत्र्या व रेनकोट वाटपासाठी स्नेह प्रायोजकत्व दिले आहे.

कार्यक्रमाची सुरुवात फाउंडेशनचे चेअरमन म्हणून जोसेफ पाटोळे यांनी फाउंडेशनद्वारे चालविण्यात येणार्या विविध सामाजिक उपक्रम ंविषयी थोडक्यात माहिती देऊन केली. गौरव पाटोळे यांनी आभार मानले.

या कार्यक्रमाचे नियोजन फाउंडेशनच्या सचिव शोभा पाटोळे व स्वयंसेवक अनिकेत पाटोळे यांनी केले.

यावेळी इंदिरानगर वस्तीतील नंदाताई राय, नम्रताताई भोसले, भारत ठोकळ, विनोद उमाप, सुनील वैराळ, सागर कांबळे, दत्ता क्षीरसागर, अण्णा गवळी आणि धनंजय घोरपडे यांचे सहकार्य लाभले. त्याच दिवशी भिंगार येथील बोल फाउंडेशनच्या कार्यालयासमोरील फासेपारधी समाजातील काही कुटुंबांतील स्त्री–पुरुष, तरुण मुले–मुली व बालकांना सहसंस्थापक अमित पाटोळे व सचिव शोभा पाटोळे यांच्या हस्ते कपड्यांचे वाटप करण्यात आले.

या प्रसंगी बालकांना बिस्किटांचे पुडे देखील वाटप करण्यात आले.



भारतीय जनता पार्टी सावेडी मंडल अध्यक्ष सी.ए.राजेंद्र काळे आयोजित मंगळागौर सांघिक खेळ स्पर्धेत बाजी मारणाऱ्या नगरमधील श्रावणी ग्रुपच्या सदस्या.

## मंगळागौर स्पर्धेत श्रावणी ग्रुपला विजेतेपदाचा बहुमान

नगर – भारतीय जनता पार्टी सावेडी मंडल अध्यक्ष सी.ए.राजेंद्र काळे आयोजित मंगळागौर सांघिक खेळ स्पर्धेत नगरमधील श्रावणी ग्रुपने प्रथम क्रमांक मिळवला आहे. अनेक संघांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता. पारंपरिक वेशभूषा, पारंपरिक खेळ, दागिने, निवेदन, स्त्रीवादक अशा निकषांवर परीक्षकांनी श्रावणी ग्रुपला विजेता घोषित केले.

श्रावणी ग्रुपमध्ये वैशाली आपटे, भक्ती पुराणिक, अनुराधा जोशी, अनुराधा पुराणिक, संध्या पावसे, स्नेहल धर्माधिकारी, मनिषा कुलकर्णी, वंदना कुलकर्णी, सविता चाबूकस्वार, वैजयंती चिकटे, रेवती नगरकर, दीपिका भारदे, तबला वादक जानवी खिस्ती यांचा समावेश होता. मागील २० वर्षांपासून हा ग्रुप कार्यरत आहे. पुणे, मुंबई, कडा, आष्टी अशा विविध ठिकाणी त्यांनी मंगळागौर स्पर्धेत सहभाग घेतला आहे. ४० ते ६५ वषापर्यंतच्या महिला यात सहभागी आहेत. नगरमधील स्पर्धेची महिनाभर आधी तयारी करून त्यांनी उत्कृष्ट सादरीकरण केले.

नाच ग घुमा, तांदूळ सुपात, नकुलबाई नकुल, दिंड, लाटण्याचं भांडण असे एकूण ५१ खेळांचे प्रकार ग्रुप सादर करीत असते. काही आधुनिक खेळांचाही यात समावेश करण्यात आला आहे. मंगळागौर बरोबरच ग्रुपच्या सदस्या सामाजिक कार्यातही योगदान देतात. पर्यावरण संवर्धनासाठी वृक्ष लागवड, प्लास्टिक मुक्ती, पाणी वाचवा अशा अभियानातून ग्रुप जनजागृती करीत असतो.

# बालघर प्रकल्पात रंगली चित्रकला स्पर्धा

**अनाथ व निराधार मुलांनी रंगाची उधळण करीत लुटला चित्रकलेचा आनंद**

नगर – तपोवन रोडवरील बालघर प्रकल्पातील वंचित, अनाथ व निराधार मुलांच्या सुप्त कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्यांक विभागाच्या वतीने एक वेगळी चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. शहर जिल्हाध्यक्ष साहेबान जहागीरदार यांच्या संकल्पनेतून ही स्पर्धा घेण्यात आली.



तपोवन रोडवरील बालघर प्रकल्पातील वंचित, अनाथ व निराधार मुलांच्या सुप्त कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्यांक विभागाच्या वतीने आयोजिलेल्या चित्रकला स्पर्धेमध्ये सहभागी झालेले विद्यार्थी.

निसर्ग चित्र, माझी शाळा आणि माझा आवडता प्राणी या विषयांवर विद्यार्थ्यांनी जीवनातील रंगमय कल्पनांचे दर्शन घडवत कागदावर रंगांची उधळण केली. विद्यार्थ्यांनी साकारलेली निसर्गचित्रे व शाळेची दृश्ये मनाला भारावून टाकणारी होती. विशेष म्हणजे कोल्हापूरच्या नांदणी येथील चर्चेत असलेल्या महादेवी हत्तीणीचे चित्र साकारून काही विद्यार्थ्यांनी सृजनशीलतेचा वेगळा ठसा उमटविला.

याप्रसंगी साहेबान जहागीरदार, जाकीर तांबोली, शहेबाज शेख, शाहनवाज शेख, अब्दुल खोकर, फिरोज पठाण, मिजान कुरेशी, बालघरचे संस्थापक युवराज गुंड, मुख्याध्यापिका सरला फंड, रुक्मिणी ठोंबरे, आशिष आहिरे आदी उपस्थित होते.

साहेबान जहागीरदार म्हणाले की, उपेक्षीत घटकातील विद्यार्थ्यांमध्ये अफाट कला व कल्पनाशक्ती दडलेली आहे. त्यांच्या हृदयातील भावना चित्ररूपाने व्यक्त होताना पाहून मन भरून येते. आमदार इद्रिस नायकवडी यांच्या सामाजिक जाणिवेतून ही स्पर्धा केवळ एक उपक्रम म्हणून नव्हे तर उपेक्षित विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी घेण्यात आली. वंचित बालकांना सृजनशीलतेसाठी व्यासपीठ देणे ही आपली जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले.

चित्रकला स्पर्धा तीन गटांमध्ये विभागली गेली होती. पहिली ते चौथी अ गट प्रथम– खुशी शिंदे, द्वितीय– अनिता माळी, तृतीय– अरविंद हारतुरकर.

इयत्ता पाचवी ते सातवी ब गट प्रथम– पूजा चौधरी, द्वितीय– अक्षय जाधव, तृतीय– रोहिणी जाधव.

इयत्ता आठवी ते दहावी क गट प्रथम– दीपक डुकरे, द्वितीय– सागर राजभर, तृतीय– निशा चौधरी.

विजेत्यांना बक्षिसे देण्यात आली. तसेच स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांना भेटवस्तू देण्यात आल्या.

## 'पायाचे पंजे व घोट्यांचे आजारासंबंधी आधुनिक उपचार' वर चर्चासत्र व कार्यशाळा

**महाराष्ट्रातील ८० अस्थितजज्ञांचा सहभाग**

नगर – अहिल्यानगर अस्थिरोग संघटना व महाराष्ट्र अस्थी रोग संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने अहिल्यानगर येथे पायाच्या पंजांचे व घोट्यांचे आजारासंबंधी आधुनिक उपचार व उपचार पद्धती सुधारण्या च्या अनुषंगाने कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या चर्चासत्र व कार्यशाळेत महाराष्ट्रातील साधारण ८० अस्थिरोग तज्ञांनी भाग घेतला व आधुनिक उपचार पद्धतीचे मार्गदर्शन घेतले.



अहिल्यानगर अस्थिरोग संघटना व महाराष्ट्र अस्थी रोग संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने पायाच्या पंजांचे व घोट्यांचे आजारासंबंधी आधुनिक उपचार व उपचार पद्धती सुधारण्याच्या अनुषंगाने कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. (छाया – समीर मन्यार)

अहिल्यानगर येथील पंजांच्या व पायाच्या आजारासंबंधीच्या गंभीर आजाराने त्रस्त असणाऱ्या रुग्णांना यापुढे पुणे मुंबई अशा मोठ्या शहरात जायची गरज पडू नये व त्यांना येथेच सवलतीच्या दरात उंच तंत्रज्ञान युक्त ट्रीटमेंट मिळावी, दुर्बिणीने होणाऱ्या पायांच्या शस्त्रक्रिया या सर्व अस्थीरोग तज्ञांनाही करता याव्यात त्याचा फायदा रुग्णांना व्हावा. हा मूळ उद्देश कार्यशाळेचा असून या चर्चासत्र व कार्यशाळेमुळे अद्यावत मशीनरीचा वापर करून व दुर्बिणीच्या साह्याने शस्त्रक्रिया करून पंजा व पायांच्या शस्त्रक्रिया सुखकर आणि सोप्या करता येतील आणि त्यामुळे निश्चित रुग्णांना याचा फायदा होईल. महाराष्ट्र अस्थिरोग संघटनेचे एक्झिक्युटिव्ह कमिटी मेंबर व अस्थिरोग तज्ञ डॉ. राहुल पंडित यांनी सांगितले.

महाराष्ट्राचे अस्थिरोग संघटनेचे अध्यक्ष संपत डुंबरे, आमदाबाद येथील डॉ. हर्ष व्यास व मुंबई येथील डॉक्टर श्याम ठक्कर यांनी पायाच्या पंजांचे व घोट्यांचे आजारासंबंधी बद्दल आधुनिक उपचार पद्धतीवर प्रात्यक्षिकाद्वारे सविस्तर मार्गदर्शन केले. मुंबई पुणे, अहमदाबाद तसेच छत्रपती संभाजीनगर येथून फूट अॅण्ड अंकल सर्जरी शास्त्रात तज्ञ असलेल्या अस्थिरोग तज्ञांनी साधारण उपचारापासून अत्याधुनिक उपचारापर्यंतचे मार्गदर्शन केले.

यावेळी पायाच्या पंजाची शस्त्रक्रिया करण्यासाठी लागणारे स्क्रू आणि रॉड यावरही कार्यशाळा घेण्यात आली आणि सॉ बोन वर्कशॉप घेण्यात आले.

अहिल्यानगर अस्थिरोग संघटनेचे अध्यक्ष डॉ. संतोष चेडे व सचिव डॉ. आशुतोष जोशी यांनी नियोजन केले व परिश्रम घेतले.

ए ओ ए चे माजी अध्यक्ष व अस्थिरोग तज्ञ डॉ. विजय पाटील यांनी आभार प्रदर्शन केले.

## रीवा-पुणे एक्स्प्रेसचे अहिल्यानगर स्थानकावर आगमन

नगर – बहुप्रतीक्षित २०१५२ रीवा–पुणे एक्स्प्रेसचे प्रथमच अहिल्यानगर रेल्वे स्थानकावर आगमन झाले. या क्षणी झेडआरयूसीसी सदस्य सुदर्शन डुंगरवाल यांच्यावतीने रेल्वे प्रशासनाच्या वतीने ट्रेनचे स्वागत करण्यात आले.



रीवा–पुणे एक्स्प्रेसचे अहिल्यानगर रेल्वे स्थानकावर आगमन झाले असता सुदर्शन डुंगरवाल यांच्यावतीने रेल्वे प्रशासनाच्या वतीने स्वागत करण्यात आले.

यावेळी वरिष्ठ मंडल अभियंता देवेंद्र कुमार, सहायक वाणिज्य प्रबंधक कपिल शर्मा, स्थानक व्यवस्थापक सुधीर महाजन, मुख्य वाणिज्य निरीक्षक शुभम थोरात यांच्यासह अनेक रेल्वे अधिकारी, कर्मचारी, नागरिक उपस्थित होते.

श्री. डुंगरवाल व रेल्वे अधिकार्यांनी ट्रेनचे लोको पायलट आणि गार्ड यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले आणि त्यानंतर हिरवा झेंडा दाखवून ट्रेनला पुढील प्रवासासाठी रवाना केले. प्रवाशांना गुलाब पुष्प व मिठाईचे वाटप करून आनंद व्यक्त करण्यात आला.

सुदर्शन डुंगरवाल यांनी अहिल्यानगर स्थानकावर ही सेवा सुरू झाल्याबद्दल रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव, रेल्वे राज्यमंत्री वी. सोमन्ना, रवनीत सिंह बिट्टू, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील तसेच मध्य रेल्वेचे महाप्रबंधक धर्मवीर मीणा यांचे आभार मानले.

या प्रसंगी योगेश मुथा, सचिन चोपडा, अमित आनेचा यांच्यासह नागरिक उपस्थित होते.



चातुर्मासानिमित्त आनंदधाम येथे विराजमान डॉ.दर्शनप्रभा म.सा., डॉ.अनुपमा म.सा. यांच्या शिष्या श्रुतसाधना म.सा., स्वयंसाधना म.सा.यांनी बुरुडगाव रोडवरील स्कायब्रिज गृहप्रकल्पास भेट देत भाविकांना मार्गदर्शन केले.

## स्कायब्रिज येथे श्रुतीसाधनाजी म.सा., स्वयंसाधनाजी म.सा. यांची सदिच्छा भेट

**साध्वीजींचे सान्निध्य व मार्गदर्शन लाभणे हे भाग्य : अमृतलाल कोठारी**

नगर – चातुर्मासानिमित्त आनंदधाम येथे विराजमान डॉ.दर्शनप्रभा म.सा., डॉ.अनुपमा म.सा. यांच्या शिष्या श्रुतसाधना म.सा., स्वयंसाधना म.सा.यांनी बुरुडगाव रोडवरील स्कायब्रिज गृहप्रकल्पास भेट देत भाविकांना मार्गदर्शन केले. त्यांचे रहिवाशांच्यावतीने स्वागत करण्यात आले. यावेळी अमृतलाल कोठारी, जयश्री अमृतलाल कोठारी, रूचीता लोढा, भारती लोढा, संगिता चंगेडिया, उषा लुणिया, अलका पारख, कला गुंदेचा, विजय गुंदेचा, प्रभा भळगट, सपना भळगट, पूनम मुथा, किरण बोरा, वैशाली मुनोत, संतोष मुनोत, पूजा बलदोटा, सिध्दी बलदोटा, प्रतिभा बलदोटा आदी उपस्थित होते.

अमृतलाल कोठारी म्हणाले, साधूसंत येती घरा तोचि दिवाळी दसरा याची अनभूती आज स्कायब्रिजमधील परिवारांना आली आहे. चातुर्मास काळात तप आराधना सुरु असताना साध्वीजींनी याठिकाणी भेट देवून मौल्यवान मार्गदर्शन केले. त्यांच्या मंगल सान्निध्याचा लाभ मिळाला हे आमच्यासाठी मोठे भाग्य आहे.

श्रुतसाधनजी म.सा.म्हणाल्या की, आचार्यश्रींची पावन भूमी असलेल्या नगरमधील भाविकांमधील धार्मिकता पाहिल्यावर प्रसन्नता लाभते. आनंदधाम येथे भाविक नित्यनियमाने दर्शनासाठी येत असतात. स्कायब्रिज हा केवळ गृहप्रकल्प नसून समविचारी व धार्मिक आचार विचार असलेल्यांचे एक मोठे कुटुंबच आहे. सर्व परिवार धर्म आराधना करतात हे कौतुकास्पद आहे.

# बालरंगभूमीच्या राज्यस्तरीय नाट्यछटा स्पर्धेला प्रतिसाद

नगर – अहिल्यानगर येथील बालरंगभूमी परिषद शाखेतर्फे मानसी भणगे स्मृती राज्यस्तरीय नाट्यछटा महोत्सवाचा समारोप व बक्षीस वितरण सोहळा ३ ऑगस्ट रोजी पेमराज सारडा महाविद्यालयातील बहूउद्देशीय सभागृहात पार पडला. यावेळी जय जय शनिदेव फेम अभिनेते संकेत खेडकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.



अहिल्यानगर येथील बालरंगभूमी परिषद शाखेतर्फे मानसी भणगे स्मृती राज्यस्तरीय नाट्यछटा महोत्सवाचा समारोप व बक्षीस वितरण सोहळा ३ ऑगस्ट रोजी पेमराज सारडा महाविद्यालयातील बहूउद्देशीय सभागृहात पार पडला.

तीन गटात पार पडलेल्या या आंतरशालेय स्पर्धेस ह्या वर्षी कल्पना नवले, रेणुका सूर्यवंशी, सिद्धी कुलकर्णी, अविष्कार ठाकूर परीक्षक म्हणून उपस्थित होते. तिन्ही गट मिळून १६२ बाल कलाकारांनी आपला सहभाग नोंदवित गट निहाय बक्षिसांची लयलूट केली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना अहिल्यानागर शाखेचे अध्यक्ष प्रसाद भणगे यांनी बालरंगभूमी परिषदेच्या येत्या वर्षभरातील कार्यक्रमांची रुपरेषा सांगितली.

मानसी भणगे स्मृती राज्यस्तरीय नाट्यछटा महोत्सवाचे हे सहावे वर्ष असून नगर जिल्ह्यासह पुणे, शिरूर, बीड शहरातुन स्पर्धेसाठी बाल कलाकार दरवर्षी उत्साहाने येतात, आपली कला सादर करीत बक्षिसे मिळवतात ह्यामुळे स्पर्धेचे दर वर्षी आयोजन होणे गरजेचे असून त्याकरीता भविष्यात काही नवनवीन संकल्पनाचा समावेश परिषद नक्कीच करेल असे आश्वासन मध्यवर्तीचे प्रमुख कार्यवाह सतीश लोटके यांनी दिले.

**महोत्सवाचा समारोप व बक्षीस वितरण सोहळा**

अ.भा.म.नाट्य परिषद अहिल्यानगर उपनगर शाखेचे अध्यक्ष प्रसाद बेडेकर यांनी आपल्या मनोगतात बालरंगभूमीच्या कार्याबद्दल समाधान व्यक्त करत अ.भा.म.नाट्य परिषद कायमच परिषदेसोबत हौशी कलाकारांशी भविष्यात आनंदाने कार्य करेल असा विश्वास व्यक्त केला.

स्पर्धा यशस्वीतेसाठी शैलेश देशमुख, तेजा पाठक, उर्मिला लोटके, सुजाता पायमोडे, श्रिया देशमुख, सपना साळुंके, प्रशांत सूर्यवंशी, सागर अलचेट्टी, विराज अडगटला आदी परिषदेचे पदाधिकारी कार्यरत होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन देवीप्रसाद सोहिनी यांनी केले. तेजस अतितकर यांनी आभार मानले.

स्पर्धेचा निकाल पुढील प्रमाणे : १) ८ वी ते १० वी गट :– सर्वोत्कृष्ट : कार्तिकी सोनावणे, साईराज सरडे, मृणाल बिरादार. उत्कृष्ट : अनुष्का भणभणे, भावना बनकर, अंकिता अंदे. उत्तेजनार्थ : अनुष्का कोरडे, मोक्षदा इंगले, मयूरी कळसाइट.

२) ४ थी ते ७ वी गट : – सर्वोत्कृष्ट : आरुष बेडेकर, कौशिक नातू, रुही पिंगळे.उत्कृष्ट : सिध्दी पाटील, देवराज गांधी, राजेश्वरी जाधव. उत्तेजनार्थ : भार्गवी गोसावी, शार्वी कराळे, शरण्या तोडकर व वेदिका लोंढे.

३) १ ली ते ३ री गट : – सर्वोत्कृष्ट : श्रीयांश घोडकें, श्रावणी राठोड, देव दमेचा, उत्कृष्टः मनस्वी भणभणे, माही तन्वर, युगंधरा लोखंडे

उत्तेजनार्थ : विहान माळी, ओवी तागड, अनुष्का साठे, ध्वज मुनोत, अवनी गोपाने.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये गरीब, गरजू रुग्णांना माफक दरातील अत्याधुनिक रुग्णसेवा हे पुण्यकर्माचे सेवा कार्य आहे

### अमित कोठारी यांचे प्रतिपादन



आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये आचार्य श्री आनंदऋषीजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आयोजित जनरल सर्जरी शस्त्रक्रिया शिबिराचे उदघाटन करताना अमित कोठारी.

नगर – जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या माध्यमातून, गरीब, गरजू रुग्णांना माफक दरातील व अत्याधुनिक आरोग्यसेवेतून अतिशय पुण्यकर्माचे सेवा कार्य अविरत सुरु असून आजच्या या जनरल सर्जरी शिबिराच्या माध्यमातून आम्हा कोठारी परिवाराला हि रुग्ण सेवा कार्याची संधी मिळत आहे हे आचार्यश्रींचे आशीर्वादच आहेत असे समजून हे कार्य असेच पुढे सुरु राहण्यासाठी यापुढेही आम्ही सर्वोतोपरी अश्या मानवसेवेच्या कार्यात कार्यरत राहू, असे गौरवोद्गार श्रीरामपूरचे उद्योजक अमित कोठारी यांनी काढले.

आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये आचार्य श्री आनंदऋषीजी महाराज यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त आयोजित जनरल सर्जरी शस्त्रक्रिया शिबिराच्या उदघाटन प्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी रतिलाल घेवरचंद कोठारी, अमित कोठारी, संजय लोढा, डॉ.वसंत कटारिया, मानकचंद कटारिया, प्रकाश छल्लाणी, डॉ.आशिष भंडारी, सुभाष मुनोत, वसंत चोपडा आदी उपस्थित होते.

रतिलाल कोठारी, अमित कोठारी (श्रीरामपूर) यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून या शिबिराचा प्रारंभ करण्यात आला. सुरवातीला डॉ.आशिष भंडारी यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

शिबिरात डॉ.प्रवीण मुनोत व डॉ. विवेक भापकर यांनी रुग्णांची तपासणी करून त्यांना मार्गदर्शन केले. शिबिराचा १०७ रुग्णांनी लाभ घेतला. प्रकाश छल्लाणी यांनी आभार मानले.



### महाकाल ग्रुपच्या वतीने श्रावण सोमवारी महाप्रसादाचे वाटप

नगर शहरात दरवर्षी महाकाल ग्रुपच्या वतीने हिंदूंचा पवित्रा श्रावण महिन्यातील सोमवारी महाकाल ग्रुपच्या वतीने भंडाऱ्याचे (महाप्रसाद) व हिंदवी शौर्य या ढोल पथकाने पारंपारिक पद्धतीने वादन करण्यात आले. तसेच महाकाल महादेवाची महाआरती करण्यात आली. यावेळी महाकाल ग्रुपचे सुमित धेंड, रवी दंडी, राजू इगे, रोहिदास बुरम, शंकर जिंदम, अक्षय वल्लाकट्टी, विशाल ठाकूर, सुनील जाधव, स्वप्निल खोडदे, वेदांत येमुल, यश सब्बन, रोहित गुगळे, सचिन शिरसाट, यश आडेप, प्रणव गुंटूक, अभिजीत येनगंदुल, श्रीनिवास श्रीगादी आदी उपस्थित होते.



भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सवानिमित्त जय जिव्हेश्वर प्रतिष्ठानतर्फे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

# रक्तदान शिबिरातून सामाजिक बांधिलकीचे दर्शन

### डॉ.विलास मढीकर यांचे प्रतिपादन; जय जिव्हेश्वर प्रतिष्ठानच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन

नगर – जय जिव्हेश्वर प्रतिष्ठान धार्मिक कार्याबरोबरच सामाजिक कार्यातही अग्रेसर आहे. रक्तदान शिबिराच्या माध्यमातून अनेकांचे प्राण वाचतात. मानवी रक्त कोणत्याही फॅक्टरी तयार होत नसल्याने सामाजिक बांधिलकी म्हणून प्रत्येकाने रक्तदान करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन जनकल्याण रक्तकेंद्राचे जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास मढीकर यांनी केली आहे.

नालेगाव येथील जनकल्याण रक्तकेंद्रात भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सवानिमित्त जय जिव्हेश्वर प्रतिष्ठानच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी जय जिव्हेश्वर प्रतिष्ठानचे संस्थापक गणेश झिंजे, अध्यक्ष किरण डफळ, स्वकुळ साळी हितसंवर्धक मंडळाचे खजिनदार गजेंद्र सोनवणे, किशोर विंचुरकर, रोहन आकडे, गणेश ढाणके, ओंकार दळवी, धनेश्वर पाठक, प्रसाद कांबळे, बाळासाहेब चोहतमल, योगेश पाठक, राकेश गवते, नीरज चांगटे, प्रकाश मारवाडे, ओंकार हराडे, गणेश दळवी, सचिन झिंजे, राजेंद्र दळवी, प्रमोद दळवी, वरूण मिस्कीन, नरेंद्र सोनवणे, संजय जठार, धनंजय साळी, तेजस मानकर, अभिजीत भंडारे, अमित डाके, राम झिंजे, जनकल्याण रक्तकेंद्राचे जनसंपर्क अधिकारी डॉ.विलास मढीकर, डॉ. गुलशन गुप्ता, चव्हाण सिस्टर, मनीषा जोशी, किशोर यादव, शंकर खंडागळे, चंद्रकला फंड आदी उपस्थित होते.

किरण डफळ म्हणाले, भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सवानिमित्त जय जिव्हेश्वर प्रतिष्ठान च्या वतीने दरवर्षी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येते.

आपण ज्या समाजात राहतो त्या समाजाचे देणे लागतो. हाच उद्देश डोळ्यासमोर ठेवून जय जिव्हेश्वर प्रतिष्ठान दरवर्षी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येते. या शिबिरात युवकांनी प्रतिसाद दिला आहे.

# श्री व्यंकटेश वरला कल्याणम् लग्न थाटात



श्रमिकनगर येथील श्री श्रमिक बालाजी मंदिराच्या ३२ व्या वार्षिक महोत्सव (ब्रम्होत्सव)निमित्त श्री व्यंकटेश वरला कल्याणम (बालाजी विवाह) सोहळा साजरा करण्यात आला. (छाया – उदय जोशी)

नगर – श्रमिकनगर येथील श्री श्रमिक बालाजी मंदिराच्या ३२ व्या वार्षिक महोत्सव (ब्रम्होत्सव) निमित्त श्री व्यंकटेश वरला कल्याणम (बालाजी विवाह) सोहळा साजरा करण्यात आला. श्री श्रमिक बालाजी सामाजिक संस्थेच्या वतीने सव्वा रुपयात जोडप्यांचा सामुदायिक विवाह लावण्यात आला. विवाहाकरीता, नगरसह विविध ठिकाणाहून वधूवर आले होते. यावेळी शहरातील नागरिक व भाविक उपस्थित होते. आतापर्यंत २१० सामुदायिक विवाह लावण्यात आले आहेत.

पहाटे सुप्रभातम पद्मशाली पुरोहित संघमने केले. जलघटाभिषेक व सकाळी सत्यनारायण महापुजा व होम हवन पुर्णाहुती करण्यात आले. यावेळी संजय बालेसर, रविंद्र कटारिया, गाडे, किरण राका, आरआरकपूर, सतिश मुथा, सुशीलकुमार छाजेड, हेमंत नरसाळे, सिध्दार्थ कटारीया, त्रिलेश येनगंदुल, विजय कारमपुरे (ठाणे), राहुल येमूल (पुणे), सागर पासकंटी, चंद्रकांत मंचे, संजय इरमल, अभी सापा (पुणे) उपस्थित होते.

विवाहापुर्वी श्रमिकनगर परिसरातून भगवान बालाजी पालखी (वरात) मिरवणुक वाद्यांसह काढण्यात आली. मिरवणुकीत महिला भजनी मंडळी टाळ घेऊन सहभागी झाले होते. ठिकठिकाणी पालखीचे स्वागत करुन भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती.

### सव्वा रुपयात दोन जोडप्यांचा सामुदायिक विवाह

श्री व्यंकटेश वरला कल्याणम् (लग्न) साठी बालाजी कल्याणम संजय पुंडलिक रच्चा, पद्मावती कल्याणम पुण्याचे व्यंकटेश आरकल, लक्ष्मी कल्याणम चेतन सिरसुल यांनी सपत्नीक विधीवत पूजा करुन बालाजी विवाह लावला. संपुर्ण परिसर श्रीमन व्यंकटरमना गोविंदा गोविंदाच्या जय घोषाने दुमदुमले होते. विवाह सोहळ्यासाठी जिल्ह्यासह राज्याबाहेरुन भाविक उपस्थित होते. यावेळी बालाजी मंदिराला आकषक विद्युत रोषणाई केली होती. यावेळी रवींद्र कटारिया, सतिश मुथा, नगरसेवक मनोज दुल्लम, धनजंय जाधव, महेंद्र गंधे, नागेश तुम्मनपेल्ली, आसाराम कावरे, श्रीनिवास बोज्ञा, देविदास संभार, रवि दंडी, बाळासाहेब गायकवाड व सव श्रमिक बालाजी, सव विश्वस्त, श्रमिक महिला मंडळ पुरोहीत संघम आदीसह उपस्थित होते.

विवाह सोहळ्यानंतर महाआरती होऊन महाप्रसादाच्या कार्यक्रमाने महोत्सवाची सांगता झाली. वार्षिक महोत्सव यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष विनोद म्याना, उपाध्यक्ष अशोक इप्पलपेल्ली, सचिव राजू येमूल, सहसचिव ज्ञानेश्वर सुंकी, दत्तात्रय कुंटला, राजू गड्डम, संजय पेगड्याल, नारायण यन्नम, शंकर येमुल, शाम बोगा, शंकर बत्तीन, लक्ष्मीकांत नल्ला, कांतीलाल पतिपाका, कुमार ए. कोलपेक, दत्तात्रय इराबत्तिन, अरूण ताटी, कैलास लक्कम, अशोक बिटला, बळीराम कोलपेक, तसेच सामुदायिक विवाह समितीचे किसनराव बोमादंडी, अंबादास महेसुनी, नरसय्या काटाबत्तीन, गणेश येमूल आदीसह श्री श्रमिक बालाजी सामाजिक संस्थेचे सर्व विश्वस्तांनी परिश्रम घेतले.

# भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सवानिमित्त विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रम

नगर – बागडपट्टी येथील श्री लक्ष्मीनारायण मंदिरात स्वकुळ साळी हितसंवर्धक मंडळाच्या वतीने भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सवानिमित्त विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती सकुळसाळी हितसंवर्धक मंडळाचे विश्वस्त प्रमुख विक्रम पाठक यांनी दिली आहे.

७ ऑगस्ट रोजी पहाटे ५ ते ६ या वेळेमध्ये भगवान श्री जिव्हेश्वर मूर्ती महाभिषेक सौ. रिधीमा लांडगे व श्री गणेश लांडगे यांच्या हस्ते होईल. सकाळी ६ ते ७ यावेळेस श्री जिव्हेश्वर जन्मोत्सवानिमित्त भगवान श्री जिव्हेश्वर ग्रंथ वाचन श्री कृष्णाराव बागडे हे करतील. सकाळी ९ वाजता सौ. मनीषा पाठक व संदीप पाठक यांच्या हस्ते श्री जिव्हेश्वर पालखी पूजन होईल. आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते महाआरती व दुपारी १२ ते २:३० या वेळेत महाप्रसादाचे वाटप करण्यात येईल. सायंकाळी ४ वाजता पालखीची सवाद्य मिरवणूक (नगर प्रदक्षिणा) होईल. तसेच ७ ऑगस्ट रोजी सकाळी १० ते १ या वेळेत भगवान श्री जिव्हेश्वर मंदिर दिल्लीगेट पटांगण येथे मोफत नेत्र तपासणी व अल्पदरात मोतीबिंदू शस्त्रक्रिया, दंत तपासणी, रक्तगट तपासणी व सीबीसी तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

### ७ ऑगस्ट रोजी भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सवानिमित्त शहरातून पालखीची सवाद्य मिरवणूक

तसेच १० ऑगस्ट रोजी सकाळी स्वकुळसाळी हित संवर्धक मंडळ व भगवान श्री जिव्हेश्वर मंदिर दिल्लीगेट पटांगण यांच्या संयुक्त विद्यमाने सायंकाळी ५ वाजता खेळ पैठणीचा होम मिनिस्टर या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. महिलांनी या कार्यक्रमात सहभाग व्हावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

या कार्यक्रमात प्रथम पारितोषिक १२,००० ची पैठणी, द्वितीय पारितोषिक ८००० रुपयाची पैठणी, तृतीय पारितोषिक ५००० रुपयाची पैठणी देण्यात येणार आहे.

या सर्व धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांसाठी स्वकुळ साळी हितसंवर्धक मंडळ, भगवान श्री जिव्हेश्वर मंदिर, दिल्लीगेट, जिव्हेश्वर तरुण मंडळ, स्वकुळ साळी महिला मंच, जय जिव्हेश्वर प्रतिष्ठान, जिव्हाळा प्रतिष्ठान, जिव्हेश्वर भक्त सेवा मंडळ, (सावेडी), माता अंकिनी दशांकिनी महिला मंडळ व सर्व विश्वस्त व कार्यकारणी सदस्य आदींचे सहकार्य लाभले आहे, अशी माहिती स्वकुळ साळी हितसंवर्धक मंडळाचे विश्वस्त प्रमुख विक्रम पाठक यांनी दिली आहे.

# ज्येष्ठ शिक्षक सुधीर भागडे सेवानिवृत्त



नगर – बेलापूर एज्युकेशन सोसायटीच्या गोंडेगाव माध्यमिक विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षक सुधीर आप्पासाहेब भागडे शासकीय वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. श्री. भागडे बीएससी बीएड असून, त्यांनी सलग ३१ वर्षे गोंडेगाव माध्यमिक विद्यालयात नोकरी करून सेवानिवृत्त ठरणारे गोंडे गावातील पहिले नोकरदार ठरले. त्यांनी ३१ वर्षाच्या सेवेत इयत्ता आठवी ते दहावी या वर्गांस गणित व विज्ञानाचे अध्यापन केले. त्यांच्या काळात अनेक विद्यार्थी डॉक्टर, इंजिनिअर, वकील, खाजगी कंपनीत व लष्करी सेवेत दाखल झाले आहे, तसेच अनेक विद्यार्थी व्यावसायिक म्हणून काम करत आहेत.

गोंडेगाव विद्यालयात जागा मिळवण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. तसेच त्या जागेत अनिवासी भारतीयच्या माध्यमातून, तसेच गोंडेगाव येथील जयवंत बाबासाहेब फोपसे व नलिनी जयवंत फोपसे यांच्या प्रयत्नार्थ शाळेत नवीन इमारत उभारून दिली. माजी विद्यार्थी व विद्यालयातील गेल्या ३० वर्षातील आजी–माजी कर्मचाऱ्यांच्या प्रयत्नातून विद्यालयाचे कार्यालय, संगणक रूम व मुख्याध्यापक कार्यालय उभारण्यास प्रयत्न केले. अहमदनगर जिल्हा गणित अध्यापक संघटनाचे श्रीरामपूर तालुका परीक्षा प्रमुख म्हणून त्यांनी काम बघितले. त्याचप्रमाणे श्रीरामपूर तालुका गणित अध्यापक संघटनेचे सचिव म्हणून त्यांनी काम बघितले सोबतच श्रीरामपूर तालुका माध्यमिक शिक्षक संघटनेचे उपाध्यक्ष म्हणून श्रीरामपूर तालुका मराठी पत्रकार संघटना चे सचिव म्हणून त्यांनी काम केले.




भारतीय जनता पार्टी, सावेडी मंडल आयोजित नाच ग घुमा मंगळागौर सांघिक खेळ स्पर्धेत श्री समर्थ विद्या मंदिर प्रशाला प्राथमिक विभाग सावेडी येथील सर्व शिक्षिकांनी सहभाग नोंदवून उत्तेजनार्थ पारितोषिक पटकावल्याबद्दल प्रशालेचे शालेय समिती चेअरमन सुरेश क्षीरसागर यांनी अभिनंदन केले. समवेत प्रशालेच्या मुख्याध्यापिका सौ. धनश्री गुंफेकर व शिक्षकवृंद (छाया – उदय जोशी)

# श्री समर्थ विद्या मंदिर प्रशाला प्राथमिक विभाग सर्व शिक्षिकांचे यश

नगर – भारतीय जनता पार्टी, सावेडी मंडल आयोजित नाच ग घुमा मंगळागौर सांघिक खेळ स्पर्धेत श्री समर्थ विद्या मंदिर प्रशाला प्राथमिक विभाग सावेडी येथील सर्व शिक्षिकांनी सहभाग नोंदवून उत्तेजनार्थ पारितोषिक पटकावले.

या यशाबद्दल प्रशालेचे शालेय समिती चेअरमन सुरेश क्षीरसागर यांनी अभिनंदन केले. तसेच नोकरी व घर सांभाळून आपल्या आवडीनिवडी अशाच जोपासत रहाव्या, अंगीभूत असलेल्या कलागुणांना वयाचा विचार न करता यापुढेही असाच वाव द्यावा असे कौतुकपर उद्गार काढले.

प्रशालेच्या मुख्याध्यापिका सौ. धनश्री गुंफेकर यांनी देखील स्पर्धेत विशेष सहभाग नोंदवला व सर्वांचे कौतुक केले. श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाच्या सर्व पदाधिकारी तसेच संस्थाचालकांनी सर्व सहभागी शिक्षिकांनी मिळवलेल्या सांघिक यशाबद्दल अभिनंदन केले.

# केडगाव उपनगरातील अमित ढोरसकर यांची अहिल्यानगर ते अक्कलकोट सायकल वारी पूर्ण

### अवघ्या ४८ तासांमध्ये ३०० किलोमीटर अंतर केले पार, निरोगी आरोग्य व प्रदुषणमुक्तीसाठी दिला संदेश



अमित ढोरसकर यांनी नगर ते अक्कलकोट हे सुमारे ३०० किलोमीटर अंतर सायकलवरून पूर्ण केले.

नगर – केडगाव मोहिनीनगर येथील रहिवासी स्वामीभक्त अमित ढोरसकर यांनी नगर ते अक्कलकोट हे सुमारे ३०० किलोमीटर अंतर सायकलवरून पूर्ण केले. एक प्रेरणादायी कामगिरी करत त्यांनी सायकलीवर अवघ्या ४८ तासांमध्ये हे अंतर कापले आहे.

या प्रवासात त्यांनी केवळ शारीरिक क्षमतेचे नव्हे तर मानसिक ताकतीचे देखील दर्शन घडवले. अक्कलकोट वारीच्या पार्श्वभूमीवर त्यांनी हा प्रवास पूर्ण करत एक सामाजिक आणि आरोग्याचा संदेश दिला आहे. या प्रवासाचे वैशिष्टये म्हणजे केडगाव येथील रेणुका माता मंदिर येथून ही सायकलवारी सुरु करण्यात आली. तर अक्कलकोट येथील स्वामींचे मंदिर येथे थांबली. ढोरसकर यांनी ही सायकलवारी करुन निरोगी आरोग्य व प्रदुषणमुक्तीसाठी सायकल वापरण्याचा संदेश दिला. त्यांनी केलेली सायकलवारी परिसरातील सर्वांसाठी ऊर्जास्त्रोत ठरत आहे. तसेच त्यांचा पुढील प्रवास उज्जेन येथे असणार आहे व नंतर साई पालखी सोहळ्यात पायी दिंडीत ते सहभागी होणार असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांच्या पुढील वाटचालीस साई सेवा मंडळ व केडगाव ग्रामस्थांच्या वतीने शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

# स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून १० ऑगस्ट रोजी शहरात मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन

### मुस्लिम सामाजिक प्रतिष्ठान व थोरात सुपर स्पेशलिटी आय केअरचा संयुक्त उपक्रम



नगर – मुस्लिम सामाजिक प्रतिष्ठान व थोरात सुपर स्पेशलिटी आय केअरच्या वतीने ७८ व्या स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. १० ऑगस्ट रोजी माणिक चौक येथील चाँद सुलताना हायस्कूल मध्ये सकाळी ११ ते दुपारी २ वाजेपर्यंत हे शिबिर होणार असून, या शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष आबिद हुसेन यांनी केले आहे.

या शिबिरात नेत्र तज्ञ डॉ. रोहित थोरात, डॉ. प्रीती थोरात या रुग्णांची तपासणी करणार असून, यामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे नेत्र तपासणी करुन उपचार केले जाणार आहेत. डोळ्यांची नंबर तपासणी, अल्प दरात मोतीबिंदू, काचबिंदू, तिरलेपणा आदी नेत्र विकारावर अल्पदरात विविध शस्त्रक्रिया केल्या जाणार आहेत. शहरातील सर्व नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेण्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. शिबिराच्या अधिक माहिती व नाव नोंदणीसाठी आबिद हुसेन ९९२१५१५७५५, शरीफ सय्यद ८४२१०२२६८४ व मनीषा श्रीगादी ८४२१४३६७२१ यांच्याशी सदर मोबाईल क्रमांकावर संपर्क साधण्याचे म्हटले आहे.

# प्रवरा ग्रामीण अभियांत्रिकी महाविद्यालयात आयईआय स्टुडंट्स चॅप्टरचे उद्घाटन



प्रवरा ग्रामीण अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये मेकॅनिकल इंजीनियरिंग विभागामध्ये दि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया) च्या स्टुडंट्स चॅप्टरचे उद्घाटन करताना भारतभूषण भागवत आदी.

नगर – प्रवरा ग्रामीण अभियांत्रिकी महाविद्यालय, लोणी च्या मेकॅनिकल इंजीनियरिंग विभागामध्ये दि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया) च्या स्टुडंट्स चॅप्टरची स्थापना करण्यात आली आहे. १ ऑगस्टला त्याचे उद्घाटन दि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया) च्या अहिल्यानगर स्थानिक केंद्राचे अध्यक्ष भारतभूषण भागवत यांचे हस्ते महाविद्यालयात करण्यात आले.

याप्रसंगी भारतभूषण भागवत यांनी संस्थेच्या कार्याबद्दल माहिती देऊन, आयईआय ही देशपातळीवर कार्यरत असलेली संस्था अभियांत्रिकी विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम राबवते, विद्यार्थ्यांनी आयोजित केलेल्या तांत्रिक उपक्रमांना आयईआय प्रसिद्धी देते व विद्यार्थ्यांना त्यांच्या कौशल्य विकासासाठी स्टुडंट्स चॅप्टरच्या माध्यमातून देशपातळीवर व्यासपीठ उपलब्ध करून देते अशी माहिती दिली. हुशार व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना आयईआय स्कॉलरशिप देते, त्याचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन त्यांनी केले. आय ई आय स्थानिक केंद्राचे प्रशासन प्रमुख बी. डी. खैरे यांनी स्टुडंट्स चॅप्टरच्या कार्यप्रणालीची माहिती सादर केली.

सुरूवातीला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एम. गुल्हाणे यांनी स्वागत करून विद्यार्थ्यांनी आयईआयच्या अहिल्यानगर केंद्रातर्फे आयोजित करण्यात येणाऱ्या पेपर प्रेझेंटेशन स्पर्धांमध्ये सहभाग घेऊन पारितोषिके जिंकावीत असे आवाहन केले.

मेकॅनिकल इंजीनियरिंग विभाग प्रमुख डॉ. एम. एस. म्हस्के यांनी प्रास्ताविक केले. निमंत्रितांच्या हस्ते स्टुडंट्स चॅप्टरच्या विद्यार्थ्यांना सभासद प्रमाणपत्रे देण्यात आली.

याप्रसंगी भारतभूषण भागवत यांनी सीएनसी मशीन्स व एडवांस्ड स्पिंडल टूलिंग या विषयावर विद्यार्थ्यांसाठी व्याख्यान दिले. उद्घाटन समारंभाला अभियांत्रिकी विभागांचे विभाग प्रमुख, प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

# गरमागरम मूग डाळ टिक्की

झटपट रेसिपी

दोस्तांनो, शिक्षण किंवा नोकरीनिमित्ताने बाहेरगावी रहाताना घरच्या चवीची आठवण येत असते. रोजच्या धावपळीत झटपट होणारे तेच ते पदार्थ खावे लागतात. मात्र एखाद्या दिवशी निवांत वेळ असल्यावर तुमच्यातला शेफ जागा होतो. मग एखादी वेगळी रेसिपी ट्राय करता येते. अर्थात ही रेसिपी पौष्टिकही असायला हवी. म्हणूनच प्रथिनयुक्त डाळीपासून टिक्की बनवता येईल. यासाठी मूग डाळ वापरता येईल. चला तर मग मूग डाळीची टिक्की बनवू या.

**सामग्री:** एक वाटी मूग डाळ, आल्याचा छोटा तुकडा, दोन हिरव्या मिरच्या, चिरलेली/कोथिंबिर, एक चिरलेला कांदा आणि सिमला मिरची, प्रत्येकी एक चमचा जिरेपूड आणि धनेपूड, एक चमचा कॉर्नफ्लोर, अर्धा चमचा आमचूर, चाट मसाला, ५० ग्रॅम पनीर, मीठ आणि तेल.

**कृती:** एका भांड्यात पाणी गरम करायला ठेवा. त्यात मूग डाळ घालून उकळून घ्या. डाळीतलं पाणी काढून टाका. आता ही डाळ थंड पाण्याने धुवून बाजूला ठेवा. डाळ थंड झाल्यावर मिक्सरच्या भांड्यात डाळ, आलं, हिरवी मिरची आणि कोथिंबिर घालून वाटून घ्या. हे वाटण एका भांड्यात काढा. आता यात चिरलेला कांदा, सिमला मिरची, जिरेपूड, कॉर्नफ्लोर, आमचूर, चाट मसाला, कुस्करलेलं पनीर आणि मीठ घाला. सर्व घटक नीट



मिसळून घ्या. हाताला थोडं तेल लावा. मूग डाळीचं मिश्रण घ्या. त्याला टिक्कीप्रमाणे गोल आकार द्या. अशाप्रकारे सर्व टिक्की बनवून घ्या. गॅसवर तवा ठेवा. त्यावर तेल घाला. गरम झाल्यावर तव्यावर टिक्की ठेवा. दोन्ही बाजूंनी खरपूस भाजून घ्या. ही टिक्की सॉस किंवा चटणीसोबत खाता येईल.




## शेर की जुबानी

सोच रखी है बहुतसी बातें,
तुम्हें मनाने के लिए,
पर तुम आते ही नहीं,
हम से बात करने के लिए।

कितनी छोटी सी
दुनिया है मेरी,
एक मैं हूं और एक,
सच्ची दोस्ती तेरी।

हम रास्तों से
दोस्ती कर लेते हैं,
मंजिल तर पहुंचना
आसान हो जाता है।


# कठोर परिश्रमातून साम्राज्य निर्मिती

अचिव्हर

अनेकांना असे वाटते, की यश फक्त त्यांनाच मिळते, ज्यांच्याकडे श्रीमंत कुटुंबाचा पैसा, नाव किंवा आधार आहे; परंतु खरे यश त्या लोकांच्या कथांमध्ये लपलेले आहे, जे सामान्य परिस्थितीतून बाहेर पडतात आणि असाधारण उंची गाठतात. अशा कथा आपल्याला आत्मविश्वास देतात, की कठोर परिश्रम, संयम आणि खऱ्या समर्पणाने काहीही साध्य करता येते. समीर माहेश्वरीची कहाणी अशी आहे, की ती कठोर परिश्रम आणि समर्पणाने आपली स्वप्ने सत्यात उतरवणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला प्रेरणा देऊ शकते.

**✽ मध्यमवर्गीय कुटुंबापासून आयआयटीपर्यंतचा प्रवास**

समीर एका मध्यमवर्गीय कुटुंबातून आला आहे. येथे त्याला आर्थिक अडचणी आणि मर्यादित संसाधनांनी जीवनाचे खरे मूल्य शिकवले. त्याने तेच त्याचे सामर्थ्य बनवले आणि आज तो ४५०० कोटी रुपयांची कंपनी, 'हेल्थकार्ट'चा मालक आहे. समीरचा जन्म जयपूरमधील एका मारवाडी मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. त्याने दिल्लीच्या प्रसिद्ध आयआयटीमध्ये शिक्षण घेतले आणि नंतर हार्वर्ड बिझनेस स्कूलमधून एमबीए केले. त्याला लहानपणीच पैशाचे महत्त्व समजले. समीरच्या आयुष्यात मध्यमवर्गीय सवयी अजूनही आहेत. आजही तो महागडे शूज खरेदी करण्यापूर्वी दोनदा विचार करतो आणि ऑनलाइन शॉपिंगमध्ये सर्वात स्वस्त डील शोधतो. तो त्याला 'मध्यमवर्गीय ऑपरेटिंग सिस्टम' म्हणतो. ती अजूनही त्याच्या विचारसरणी आणि निर्णयांवर प्रभाव पाडते. त्याच्यासाठी या सवयी केवळ पैसे वाचवण्याबद्दल नाहीत, तर शिस्तबद्ध आणि कष्टाळू जीवन जगण्याबद्दल आहेत.



**✽ हेल्थकार्टची सुरुवात**

समीरने २०११ मध्ये प्रभात टंडनसह 'हेल्थकार्ट' कंपनीची सुरुवात केली होती. सुरुवातीला 'हेल्थकार्ट' ही आरोग्य आणि फिटनेस उत्पादने विकणारी एक छोटी कंपनी होती. नंतर २०१५ मध्ये त्याचा एक भाग १ एमजी म्हणून वेगळा करण्यात आला. तो आता टाटा समूहाचा भाग आहे. समीरने 'हेल्थकार्ट' ऑनलाइन आणि ऑफलाइन या दोन्ही प्रकारात वाढवले. आज त्याची कंपनी प्रथिने, जीवनसत्त्वे आणि हर्बल सप्लिमेंट्ससारखी उत्पादने विकते आणि देशभरात त्याचे स्टोअर्स आहेत. २०२२ मध्ये हेल्थकार्टने १३५ दशलक्ष डॉलर्सचा निधी उभारला. त्यामुळे कंपनीचे मूल्य ५०० दशलक्ष डॉलर्स झाले. मध्यमवर्गीय जीवनाने समीरला पैशाचे मूल्य, गरज आणि इच्छा यांच्यातील फरक, बचत करण्याची सवय आणि छोट्या छोट्या गोष्टींमध्ये आनंद शोधणे शिकवले, असे त्याला वाटते.

**जीवनातील महत्त्वाचे मुद्दे**

**✽ प्रत्येक रुपयाचे मूल्य समजतेः** पैसे खर्च करण्यापूर्वी अनेक वेळा विचार करणे महत्वाचे आहे.

**✽ गरज आणि छंद यातील फरक :** बाहेर खाणे हा एक आनंद आहे. तो रोजचा दिनक्रम बनवू नये. प्रथम बचत करा, नंतर खर्च करा. तुमच्याकडे जे आहे ते संतुलित करायला शिका. यामुळे कृतज्ञतेची भावना येते.


**✽ तुलना शक्ती देते :** इतरांशी स्पर्धा करणे स्वतःला सुधारण्याची प्रेरणा बनते.

लोकांना ते खूप आवडले आणि त्यांनी त्यांच्या कथादेखील शेअर केल्या. समीरची कहाणी आपल्याला यश पदवी किंवा मोठ्या पदव्यांनी मिळत नाही, तर कठोर परिश्रम, शिस्त आणि योग्य विचारसरणीने मिळते हे शिकवते. त्याच्या आयुष्यातील प्रत्येक पाऊल आपल्याला सांगते, की आवड असेल तर कोणतेही स्वप्न अशक्य नाही.

## टेक नॉलेज

### 'पर्ल'मध्ये आयओएस बीटा आवृत्ती


'पर्ल' मोबाईलमध्ये 'आयओएस २६' सार्वजनिक बीटा आवृत्तीचा वापर सुरू करण्याची संधी आहे. ही प्रक्रिया खूप सोपी आहे. 'पर्ल' ब्राउझरवरून ' पर्ल बीटा' सॉफ्टवेअर प्रोग्राम वेबसाइटवर जा. 'पर्ल' आयडीसह लॉगिन करा आणि बीटा प्रोग्रामसाठी नोंदणी करा. नंतर आयफोन सेटिंग्ज सामान्य सॉफ्टवेअर अपडेटवर टॅप करा. येथे तुम्हाला 'आयओएस २६ बीटा' दिसेल. ती डाउनलोड आणि इनस्टॉल करू शकता. 'आयओएस २६' ची बीटा आवृत्ती आयफोन ११ आणि त्यावरील सर्व मॉडेल्सवर उपलब्ध आहे. तसेच, आयफोन एसई (दुसरी आणि तिसरी जनरेशन) वापरकर्तेदेखील या अपडेटचा लाभ घेऊ शकतात. सप्टेंबर २०२५ मध्ये आयफोन १७ मालिकेच्या लॉंचिंग दरम्यान ॲपल आयओएस २६ ची स्थिर आणि अंतिम आवृत्ती रिलीज करू शकते. सध्या, नवीन वैशिष्ट्ये प्रथम वापरून पाहू इच्छिणाऱ्या वापरकर्त्यांसाठी सार्वजनिक बीटा हा सर्वोत्तम मार्ग आहे.




## ॲप वर्ल्ड

### इन्स्ट्राग्राम आणणार ऑटो स्क्रोल फीचर

भारतातील करोडो लोक इंस्टाग्राम वापरतात. टिकटॉकवर बंदी आल्यापासून इंस्टाग्राम रील्सने 'सोशल मीडिया'वर धुमाकूळ घातला आहे. लोक रात्रंदिवस रील्स स्क्रोल करताना पाहायला मिळतात. अनेकांना याची सवय लागली आहे. याचा वाईट परिणाम शरीरावर आणि मानसिक आरोग्यावर होताना दिसत आहेत. अशातच आता इंस्टाग्राम एक नवीन ऑटो स्क्रोल फीचर आणणार असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे रील्स पाहण्याचे व्यसन आणखी वाढण्याची शक्यता आहे. काही नेटकऱ्यांनी फेसबुक, थ्रेड्स आणि एक्सवर स्क्रीनशॉट शेअर केले आहेत. त्यात इंस्टाग्राममध्ये ऑटो स्क्रोल नावाचा एक नवीन पर्याय दिसत आहे. हे फीचर ॲक्टिव्हेट केल्यावर तुम्हाला रील स्क्रोल कराव्या लागणार नाहीत. एक रील संपल्यावर लगेच दुसरी रील आपोआप प्ले होईल. यामुळे युजर्सचे रील स्क्रोल करण्याचे कष्ट वाचणार आहे. हे फीचर नेटफ्लिक्सच्या ऑटो प्ले फीचरसारखे असण्याची शक्यता आहे.




# वेगन होताना...

फिटनेस फंडा

जगभरातच सध्या 'वेगन डाएट'चा ट्रेंड आहे. 'वेगन' होणं म्हणजे प्राणीजन्य पदार्थ आहारातून पूर्णपणे वर्ज्य करणं. यात फक्त मांसाहारचं नाही तर दूध आणि दुग्धजन्य पदार्थही आहारातून वगळले जातात. दुग्धजन्य पदार्थांमध्ये भरपूर पोषणमूल्यं असल्यामुळे अचानक वेगन होणं सोपं नसतं. वेगन पदार्थ सगळीकडे उपलब्ध नसतात. त्यातच शरीराला आवश्यक असणारी पोषणमूल्यं इतर माध्यमातून मिळवणं गरजेचं असतं. वेगन डाएट फॉलो करताना त्याचं नीट नियोजन करायला हवं. वेगन होताना काय करायला हवं याविषयी...

✽ अचानक वेगन होता येत नाही.




शाकाहारी असाल तर पहिल्यांदा पनीर किंवा दूध बंद करा. काही दिवसांनी तूप, लोणी बंद करा. अशा पद्धतीने हळूहळू पुढे जा.

✽ वेगन होताना किंवा कोणतीही आहारपद्धती स्वीकारताना आपण काय खाऊ शकत नाही याचा अधिक विचार केला जातो. त्याऐवजी काय खाऊ शकतो हे ठरवा. पोषक वनस्पतीजन्य पदार्थांचा शोध घ्या. फळं, भाज्या, राजमा, भात, चिया सीड्स, जवस असे अनेक पर्याय सापडतील.

✽ सकाळी उठल्यावर चहा-कॉफी पिण्याची सवय असेल तर दुधाला पर्यायी घटक शोधा. आल्मंड मिल्क, नारळाचं दूध, सोया मिल्क हे पर्याय तुम्ही ट्राय करू शकता.

✽ 'बी १२' हे अत्यंत महत्त्वाचं जीवनसत्त्व आहे. 'बी १२' जीवनसत्त्व प्राणीजन्य पदार्थामध्ये आढळतं. वेगन होताना 'बी १२' युक्त पदार्थांचा शोध घ्या.



# आर्किटेक्ट व्हायचंय?

वेगळ्या वाटा

सध्या स्मार्ट सिटीज आणि ग्रीन बिल्डिंगचा जमाना आहे. आर्किटेक्ट्सना बऱ्याच नव्या संधी उपलब्ध होत आहेत. या करिअरविषयी...

✽ आर्किटेक्ट बनण्यासाठी विज्ञान शाखेत प्रवेश घ्यायला हवा. बारावीनंतर 'नॅशनल ॲप्टिट्यूड टेस्ट इन आर्किटेक्चर'(नाटा) ही परीक्षा द्यावी लागते. यानंतर सरकारी किंवा खाजगी संस्थेत प्रवेश घेता येतो. आर्किटेक्चरचा अभ्यासक्रम पाच वर्षांचा असतो.


✽ 'नाटा'शिवाय 'जेईई मेन' आणि 'जेईई ॲडव्हान्स' या परीक्षा देऊन एनआयटी आणि आयआयटीमधल्या आर्किटेक्चर अभ्यासक्रमांना प्रवेश घेऊ शकता.

✽ आर्किटेक्चरमध्ये पोस्ट ग्रॅज्युएशन करण्यासाठी 'गेट' परीक्षा द्यावी लागते. यानंतर 'मास्टर्स ऑफ आर्किटेक्चर'ला प्रवेश घेता येतो.

✽ एग्जिबिशन डिझायनर्स, इंटिरिअर आर्किटेक्ट्स, लँडस्केप आर्टिटेक्ट्स /डिझायनर्स, आर्किटेक्चरल इंजिनिअर्स, प्लॅनर्स म्हणूनही तुम्ही काम करू शकता.

## स्मार्ट टिप्स

### जीमेल सुरक्षेसाठी 'पास की'




आतापर्यंत तुम्ही जीमेल अकाउंटमध्ये साइन इन करण्यासाठी पासवर्ड वापरत होता. पण आता साइन इन करण्यासाठी 'पास की' वापरावी. त्यामुळे जीमेल अकाऊंट नेहमीच सुरक्षित राहील आणि कोणीही तुमचा पासवर्ड हॅक करू शकणार नाही. जीमेल अकाउंटमध्ये साइन इन करण्यासाठी आपण पासवर्ड एंटर करतो. परंतु 'पास की' मध्ये असे होत नाही. ते सुरक्षित मानले जाते. कारण त्यासाठी तुमचा चेहरा, बोट, पिन आवश्यक आहे. म्हणजे आपण सक्रिय नसताना कोणीही आपल्या जीमेल अकाउंटमध्ये साइन इन करू शकत नाही. आपण सहजपणे 'पास की' तयार करू शकतो. यासाठी आपल्याकडे Windows 10, macOS Ventura आणि ChromeOS १०९ वर चालणारा पीसी किंवा लॅपटॉप सिस्टम हे डिव्हाइस असणे आवश्यक आहे. स्मार्टफोनमध्ये android 9 किंवा iOS 16 आवृत्ती असणे आवश्यक आहे.




# 'परप्लेक्सिट'साठी मेटा, पर्ल इच्छुक


व्हॉट्स न्यू?

सध्या आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) जगतात मोठी खळबळ उडवून देणाऱ्या कंपन्यांमध्ये 'परप्लेक्सिटी एआय' हे नाव वेगाने पुढे येत आहे. ही कंपनी २०२२ मध्ये अमेरिकेतील सॅनफ्रान्सिस्को येथे सुरू झाली आणि अवघ्या काही वर्षांत ती टेक क्षेत्रातली लक्षवेधी ताकद ठरू लागली आहे. आता ही कंपनी इतकी चर्चेत आहे की 'मेटा आणि 'पर्ल'सारख्या महाकाय कंपन्या तिला विकत घेण्यासाठी उत्सुक आहेत.

'परप्लेक्सिटी ' ही फक्त एक चॅटबॉट नाही, तर ती एक 'कॉन्व्हर्सेशननल सर्च इंजिन' आहे. 'गूगल' किंवा 'बिंग'प्रमाणेच त्याचे कार्य चालते. पण विशेष म्हणजे त्यावर जाहिरातीचा मारा नाही. ते थेट स्रोतांसह संक्षिप्त, अचूक उत्तर देते. 'परप्लेक्सिटी ' दर महिन्याला जवळपास ७८० दशलक्ष सर्च क्वेरीज हाताळते आणि दर महिन्याला त्यात २० टक्क्यांची वाढ होत आहे. म्हणजेच वापरकर्त्यांचा विश्वास आणि वापर सतत वाढतो आहे. याच कंपनीने अलीकडेच 'कॉमेट' नावाचे एक एआय-बेस्ड ब्राउजर असिस्टंटदेखील लॉंच केलं आहे. ते ऑनलाइन शॉपिंग, ईमेल व्यवस्थापन आणि वेबपेज सारांश तयार करण्यात मदत करते. 'परप्लेक्सिटी ' सारख्या यशस्वी आणि झपाट्याने वाढणाऱ्या कंपनीला विकत घेणे 'मेटा' साठी एक उत्तम पर्याय असू शकतो.

# मुलाखतीची पूर्वतयारी कशी कराल?

ग्रुमिंग



मुलाखतीला जाताना चांगली पूर्वतयारी करून जाणे आवश्यक आहे.

**✽ कंपनीचा अभ्यास आणि संशोधन**

तुम्ही नोकरीसाठी अर्ज केलेल्या कंपनीबद्दल मिळेल ती सर्व माहिती गोळा करा. कंपनीच्या मिशन आणि व्हिजन स्टेटमेंटचा अभ्यास करा. प्रॉडक्ट डिस्क्रिप्शन, कंपनी पुरवत असलेल्या सेवा तेथील प्रमुख कर्मचारी इत्यादींचा अभ्यास करा. कंपनीचे 'सोशल मीडिया' पेज असेल तर ते पाहा म्हणजे सद्यस्थितीत कंपनीत काय सुरू आहे, हे कळेल.

**✽ मुलाखतीतील प्रश्नांचा सराव**

कुटुंबातील एखाद्या सदस्यासोबत वा मित्रासोबत मुलाखतीत विचारल्या जाऊ शकणाऱ्या संभाव्य प्रश्नांचा सराव करावा. मुलाखतीतील सामान्य प्रश्न हे तुमची बलस्थाने, तुमच्या कमजोर जागा, कंपनीने तुम्हाला नोकरी का द्यावी आणि तुमची दीर्घकालीन व्यावसायिक उद्दिष्टे आर्दीशी संबंधित असतात.

**✽ रिझ्युमे तयार करा**

'रेझ्युमे' कंपनीच्या गरजेनुसार बनवलेला असावा. त्यातून तुम्ही त्या पदासाठी कसे योग्य उमेदवार आहात, हे दिसून आले पाहिजे. तुम्हाला मुलाखतीसाठी बोलवायचे की नाही हेसुद्धा तुमचा 'रेझ्युमे' ठरवेल. तुमच्याबद्दलचे 'फर्स्ट इम्प्रेशन' तुमचा 'रेझ्युमे' निर्माण करत असतो.

**✽ वेळेचे नियोजन**

मुलाखतीसाठी वेळेवर हजर राहा. शक्यतो दहा - पंधरा मिनिटे तरी आधी जा. नोकरी देणारे आपल्या उमेदवाराकडून वक्तशीरपणाची अपेक्षा करतात.

# मित्रावर विश्वास ठेवावा का?

मॅच मेकिंग

'इं नऊ महिन्यांपूर्वी एका डेटिंग ॲपवरून माझी एका मुलाशी ओळख झाली. आम्ही लग्नाबाबत अजून काहीच ठरवलेलं नसलं तरी एकमेकांचा गांभीर्याने विचार करतो. आम्ही बाहेर फिरायला गेल्यावर हा मुलगा माझ्या खूप जवळच्या मैत्रिणीशी जवळीक करण्याचा प्रयत्न करतो. माझ्या मैत्रिणीलाही यात काहीच वावगं वाटत नाही. आम्ही तिघं एकत्र असल्यावर मी अडगळीत पडल्यासारखी असते. तो सतत तिच्याशीच बोलतो. मी याबाबत त्याला विचारलं. त्यावर ही फक्त गंमत असल्याचं त्याचं म्हणणं आहे. त्याच्यावर विश्वास ठेवता येईल का?



**उत्तर :** तू त्याला अजूनही पूर्णपणे ओळखलेलं नाहीस. ती तुझी खूप जवळची मैत्रीण असल्यामुळे तिच्याशी मोकळेपणाने बोलयला काहीच हरकत नाही. यानंतर तू तुझ्या मित्राशी बोल. मैत्रिणीशी असणारी जवळीक आवडत नसल्याबद्दल सांग. तुला घाबरण्याचं काहीच कारण नाही. या नात्याला अजून फार काळ लोटलेला नाही. त्यामुळे या मुलाचे खरे रंग जाणून घेतल्यानंतरच पुढे जा.

# पारंपरिक आणि फ्यूजनवर लक्ष

फॅशन पॅशन



सणांचा हंगाम येताच स्वतःला अशा प्रकारे सजवावे की लोक त्याची दखल घेतील, असे प्रत्येकाच्या मनात येते. नवरात्रोत्सव सुरू होताच, तरुणांमध्ये नवीन फॅशनची क्रेझ दिसून येते. त्याच वेळी, बाजारपेठ त्यांना एक नवीन लूक आणि स्टाइल देण्यासाठीदेखील सज्ज होते. आजकाल ब्रीचची क्रेझ आहे. म्हणूनच सध्या मुलांचे लक्ष पारंपारिक आणि फ्यूजनवर आहे.

सणांचा हंगाम लक्षात घेऊन, हलके आणि चमकदार रंगांना महत्त्व दिले जात आहे. त्याच वेळी तरुण भारतीय आणि पाश्चात्य पोशाखांच्या संयोजनांची मागणी करत आहेत. कॉटन सिल्क, प्युअर सिल्क आणि मटका सिल्क कापडांचा वापर केला जात आहे. समकालीन फॅशन पोशाखांमध्ये नवीन प्रयोग केले जात आहेत.

**✽ ब्रीचची विशेष मागणी**

राजस्थानची खास ओळख असलेल्या ब्रीच (रायडर्स पॅन्ट) आता अनेक शहरांमध्ये नवीन प्रयोगांसह सादर केले जात आहेत. सणासुदीच्या काळात त्याला विशेष मागणी असते. याशिवाय कुर्ता धोती, हाफ जॅकेटसह कुर्ता चुडीदार, ब्रीचसह शॉर्ट कुर्ता, काउल पॅंटसह अंगरखा (धोतीची नवीन आवृत्ती) यांनाही विशेष पसंती दिली जात आहे. आजकाल तरुणांना समकालीन फॅशन पोशाखांमध्ये नवीन व्हेरिएशन पहायचे आहे. म्हणून नवीन प्रयोगांसह सादरीकरणावर लक्ष केंद्रित केले जात आहे. सणासुदीच्या काळात पुरुषांना फॅशनमध्ये पिवळा, नारंगी, फिरोजा हिरवा आणि निळा असे रंग आवडतात.

रंग आणि कापडांचा विचार केला तर फॅशन पूर्वीसारखीच आहे. परंतु उत्सवाच्या हंगामात कुर्ता, अंगारखा, शॉर्टकुर्ता यासारख्या पोशाखांसह ती वापरली जात आहे. उदाहरणार्थ, पूर्वी शर्टमध्ये प्रिंट शर्टची फॅशन चालू होती. आता सणाप्रमाणे कुर्त्यासारख्या पोशाखांमध्ये त्याची मागणी वाढली आहे. आजकाल पुरुषांच्या फॅशनमध्ये प्रिंटिंग कुर्ता ट्रेंड करत आहेत.




# तोरणमाळला चला

भटकंती

फिरायला गेल्यावर गर्दी, गजबजाट नकोसा वाटतो. प्रसिद्ध पर्यटनस्थळांवर लोकांची गर्दी झालेली असते. त्यामुळे एखाद्या अपरिचित, ऑफबीट ठिकाणाचा शोध घेतला जातो. असंच एक थंड हवेचं ठिकाण म्हणजे तोरणमाळ. तोरणमाळ हे नंदुरबार जिल्ह्यातलं सातपुडा पर्वतरांगांमध्ये वसलेलं निसर्गरम्य पर्यटनस्थळ आहे. इथे गोरक्षनाथाचं प्रसिद्ध मंदिर आहे. तोरणमाळच्या आसपास पहाण्यासारखं बरंच काही आहे. इथून दीड किलोमीटर अंतरावर सीता खाई आहे. इथे काही काळ घालवता येईल. ही दरी लक्ष वेधून घेते. इथला धबधबा हे पर्यटकांचं मुख्य आकर्षण आहे.

कमळ तलावात भरपूर कमळं पहायला मिळतात तर यशवंत तलावही लक्ष वेधून घेतो. मच्छिंद्रनाथ गुहा ही नैसर्गिक पद्धतीने तयार झालेली गुहा असून इथे मच्छिंद्रनाथांनी ध्यानधारणा केली होती. त्यामुळे हे ठिकाणही पर्यटकांच्या आकर्षणाचं केंद्र ठरतं. इथल्या खडकी पॉईंटवर ट्रेकिंग करता येतं. इथून तोरणमाळचं विहंगम दृश्य दिसतं. मध्य प्रदेशच्या सीमेवरचा आवशाबारी पॉईंटही गर्दी खेचतो. यासोबतच कॉफी गार्डन, सनसेट पॉईंट नागार्जुन पॉईंट अशी ठिकाणंही आहेत.

तर अशा या तोरणमाळला जाण्यासाठी शहादाला उतरता येईल. शहादाहून तोरणमाळ ५५ किलोमीटरवर आहे. नाशिकहूनही शहादाला जाता येईल. सुरतहून शहादा २००किलोमीटरवर आहे. धुळे, चाळीसगाव या रेल्वेस्थानकांवरूनही या ठिकाणी पोहोचता येईल.

# घरफोड्या व चोऱ्यांचा तपास तातडीने लावावा अन्यथा तीव्र स्वरूपाचे 'आंदोलन' उभारणार

## आमदार संग्राम जगताप यांचा इशारा, जिल्हा पोलीस अधीक्षक यांना निवेदन



शहरातील वाढत्या घरफोड्या व वाहन चोऱ्यांबाबत गांभीर्यपूर्वक दखल घेऊन योग्य कार्यवाही करावी, या मागणीचे निवेदन पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांना देण्यात आले. (छाया - लहू दळवी)

नगर - शहरातील वाढत्या घरफोड्या व वाहन चोऱ्यांबाबत गांभीर्यपूर्वक दखल घेऊन लवकरात लवकर योग्य ती कार्यवाही करावी, या मागणीचे निवेदन आमदार संग्राम जगताप यांनी पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांना दिले.

या निवेदनात म्हटले आहे की, अहिल्यानगर शहर हद्दीत तोफखाना, कोतवाली व भिंगार कॅम्प असे ३ पोलीस स्टेशन प्रामुख्याने येतात. त्यांच्या हद्दी पूर्ण शहराभोवती आहेत. सध्या परिस्थिती पाहता शहरातील नागरिक हे कुठे बाहेर गावी गेले, तर त्यांच्या बंद घरामध्ये चोरी केली जाते. काही घरफोड्यांसारखे प्रकार केले जात आहेत. त्यामुळे सध्या शहरातील जनता चोरट्यांपासून भयभीत आहे. संध्याकाळी किंवा मॉर्निंग वॉकवेळी किंवा इतर कामानिमित्त महिला या एकटया दिसल्या, तर त्यांच्या गळ्यातील मंगळसुत्र अगर सोन्याचे दागिने चोरुन नेण्यासारखे प्रकार सर्रासपणे घडत आहेत. म्हणजेच रस्त्यावर चालणाऱ्या महिला सुरक्षित नसल्याचे दिसून येते.

काही ठिकाणी घरासमोर लावलेली वाहने चोरी होत आहेत. तोफखाना हद्दीतील एक टाटा हॅरिअर कंपनीची चारचाकी गाडी, कोतवाली हद्दीतील सनी चोरडिया यांची एम एच १६ सी व्ही ००३१ नंबरची टाटा हॅरिअर गाडी व भिंगार कॅम्प पोलिस स्टेशन हद्दीतील धोंडीराम चोभे यांच्या मालकीची एम एच १६ सी व्ही७१३२ नंबरची महिंद्रा स्कॉरपिओ चारचाकी गाडी अशा चारचाकी गाड्या या दोन दिवसांत चोरीस गेल्या. पहिल्या दिवशी चारचाकी गाडीची चोरी झाली, तरी सुद्धा दुसऱ्या दिवशीही रात्री चारचाकी गाडी पुन्हा चोरीला जाते, याचाच अर्थ पोलिस प्रशासन रात्री ग्रस्त व चोरांचा बंदोबस्त करण्यात कमी पडत आहेत. त्यामुळे सामान्य नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना राहिलेली नाही, असेही निवेदनात म्हटले आहे.

डी चंद्रकांत नामक कपड्याच्या दुकानात जे शहरात मध्यवर्ती असलेल्या बाजार पेठेत आहे. तेथे पहाटे चार वाजता चोरी झाली. या चोरीत चोरटयांच्या हालचाली या कॅमेरात स्पष्टपणे कैद झाल्या आहेत. या आधी ही शहरातील उपनगरातील व भिंगार हद्दीतील बाजारपेठांमध्ये सुद्धा चोऱ्यांचे सत्र सुरूच असून, आपल्या प्रशासनामार्फत कुठेही ठाम कारवाई करताना दिसून येत नाही. पोलिस प्रशासनामार्फत मंगळसूत्र चोरीला आळा घालण्यासाठी ठिकठिकाणी नाका बंदी ही दिसून येत नाही. रात्री गस्त करणाऱ्या पोलिसांकडुन रात्र गस्त नीट होत नसल्याचे दिसून येते. आपल्या पोलिस स्टेशनला असणाऱ्या पोलिस कर्मचारी यांच्याकडुन अवैध धंदे करणाऱ्यांना मदत केली जात असून, रात्री-अपरात्री चालणाल्या अवैध धंद्यामुळे शहर हे ११ वाजेनंतरही चालु असल्याचे दिसुन येते. त्यामुळे गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या लोकांचा वावर जास्त प्रमाणात वाढल्याचे दिसुन येते.

सदर मंगळसूत्र चोरी, घर फोडी, वाहन चोरी, बाजार पेठेतील चोरी व अशा अनेक चोऱ्यांमुळे सामान्य नागरिक त्रस्त असून, पोलिस प्रशासनाकडुन लवकरात लवकर ठाम कारवाई करण्यात आली नाही, तर आम्हाला या पुढील येणाऱ्या काळात तीव्र आंदोलन करावे लागेल, अशा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

यावेळी संपत बारस्कर, सुरेश बनसोडे, विपूल शेटिया, बाळासाहेब पवार, सुनील त्र्यंबके, अभिजीत खोसे, नितीन घोडके, गणेश बारस्कर, दीपक खेडकर, सुमित कुलकर्णी, संतोष बोरा, गोपाळ मणियार, राजेंद्र बोथरा, अशोक भंडारी, संजय लोढा, विश्वनाथ कासट, दीपक नवलानी, रमेश दुलम, गिरीश खुबचंदानी, प्रतीक बोगावत, दीपक खंडेलवाल, यश तलरेजा, केतन मुथा आदीं उपस्थित होते.



नगर, जेऊर ते पांढरीपुल रस्ता तात्काळ दुरुस्त करण्याच्या मागणीचे निवेदन जन आधार सामाजिक संघटनेच्यावतीने कार्यकारी अभियंता कुंदन दंडगव्हाळ यांना देण्यात आले.

# नगर, जेऊर ते पांढरीपुल रस्ता तात्काळ दुरुस्त करण्यात यावा अन्यथा रास्ता रोको आंदोलन

नगर - अहिल्यानगर, जेऊर ते पांढरीपुल घाट रस्ता मागील ३ ते ४ वर्षांपासून अत्यंत खड्डेमय असून, नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे. या रस्त्याच्या तात्काळ दुरुस्तीची मागणी जन आधार सामाजिक संघटनेने करत कार्यकारी अभियंता कुंदन दंडगव्हाळ यांना निवेदन दिले. अन्यथा १५ दिवसांत शेंडी येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही संघटनेने दिला आहे. या निवेदनप्रसंगी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रकाश पोटे, गणेश गारुडकर, शहबाज शेख, अशोक बनसोडे, सुरेश कसाब आदी उपस्थित होते.

संघटनेच्या म्हणण्यानुसार, जेव्हा हा रस्ता बीओटी तत्त्वावर होता, तेव्हा संबंधित कंत्राटदार देखभाल करत होते. मात्र, विकासाची मुदत संपल्यानंतर हा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करण्यात आला, परंतु विभागाने रस्त्याकडे पूर्णतः दुर्लक्ष केल्याने आज तो अत्यंत खराब स्थितीत आहे. पुणे-अहिल्यानगर-छत्रपती संभाजीनगर रस्त्याचे वर्गीकरण महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाकडे (MSIDC) यांच्याकडे १९ सप्टेंबर २०२४ रोजी करण्यात आले, परंतु त्यांनी अद्याप रस्त्याची दुरुस्ती सुरू केलेली नाही. दुसरीकडे, रस्ता त्यांच्या अखत्यारीत नसल्याचा हवाला देत झथऊही जबाबदारी टाळत आहे. या वादामुळे रस्त्याची दुरवस्था झाली असून अनेक निष्पापांनी प्राण गमावले आहेत.

अलीकडील पावसामुळे अहिल्यानगर ते देवगड दरम्यानचा रस्ता अधिकच खराब झाला आहे. आषाढी वारीदरम्यान मुरूम टाकून बुजवलेले खड्डे एका पावसातच पूर्ववत झाले. दुभाजक रंगरंगोटीविना असल्याने रात्री अपघातांची शक्यता अधिक आहे. दुचाकीस्वार, लहान वाहने खड्ड्यांमुळे अपघातांना बळी पडत आहेत सदर रस्ता संबंधित योग्य प्राधिकरणाकडे त्वरित वर्ग करण्यात यावा व तातडीने दुरुस्तीच्या कामांना सुरुवात करावी अन्यथा, जन आधार सामाजिक संघटना १५ दिवसानंतर शेंडी येथे रास्ता रोको आंदोलन छेडेल, असा इशारा देण्यात आला आहे.

# नवीन तंत्रज्ञानावर आधारित अभ्यासक्रमांसाठी नगर जिल्ह्यातील आयटीआयमध्ये प्रवेश सुरू

नगर - कै. माणिकराव नरसिंगराव पाटील औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अहिल्यानगर व सेनापती बापट शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, पारनेर येथे सौर तंत्रज्ञ (Solar Technician), तसेच लोकनेते गोपीनाथ मुंडे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, पाथर्डी येथे मेकॅनिक इलेक्ट्रिक वाहन (Mechanic Electric Vehicle) या नवीन अभ्यासक्रमांना प्रशिक्षण महानिदेशालय, नवी दिल्ली यांनी नुकतीच संलग्नता प्रदान केलेली आहे. इच्छुक उमेदवारांनी या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी सुनील शिंदे यांनी केले आहे.

सध्याच्या काळात पर्यावरणाची बिकट स्थिती व नैसर्गिक साधनसामुग्रीचा मर्यादित उपयोग लक्षात घेता, अपरंपरागत ऊर्जा स्रोतांचा प्रभावी व कार्यक्षम वापर होण्यासाठी हे नवीन व्यवसाय अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत. या अभ्यासक्रमांमधून युवकांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या मोठ्या प्रमाणावर संधी उपलब्ध होणार आहेत.

उमेदवारांनी www.admission.dvet.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज भरून संबंधित संस्थेच्या समुपदेशन केंद्राला भेट देऊन अर्ज सादर करावेत, असेही कळविण्यात आले आहे.

# न्यू आर्ट्स, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेजची संशोधन क्षेत्रात भरारी

## मानवविद्या शाखेसाठी 'शोध सेतू' पायलट प्रकल्पांतर्गत निवड

नगर - कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव आणि महाराष्ट्र ज्ञान केंद्र, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने मानवविद्या शाखेसाठी 'क्लस्टर संशोधन प्रकल्प' या नावाने एक महत्वाचे चर्चासत्र नुकतेच पार पडले. राज्यभरातील सात विद्यापीठांमधून फक्त ३५ महाविद्यालयांची या प्रकल्पासाठी निवड करण्यात आली असून, यामध्ये अहिल्यानगर येथील न्यू आर्ट्स, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेजचा समावेश आहे.

हे चर्चासत्र एक पायलट स्टडी म्हणून आयोजित करण्यात आले असून, त्याचा मुख्य उद्देश म्हणजे मानवविद्या शाखेतील विद्यार्थ्यांना शास्त्रशुद्ध संशोधन कौशल्य प्राप्त करून देणे हा आहे. यासाठी 'शोध सेतु' नावाचे अत्याधुनिक संशोधन पोर्टल तयार करण्यात आले आहे. हे पोर्टल निवडलेल्या महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना संशोधन प्रक्रियेतील विविध टप्प्यांचे मार्गदर्शन करणार असून, त्यांच्या संकल्पनाशक्तीला आणि अभ्यासवृत्तीला बळकटी देणार आहे. 'शोध सेतु' या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना विषयांची निवड, समस्या मांडणी, साहित्य संकलन, आकडेवारीचे विश्लेषण आणि निष्कर्ष मांडणी यासारख्या संशोधनाच्या मूलभूत गोष्टींचा सखोल अभ्यास करता येईल. याशिवाय तांत्रिक सहाय्य, मार्गदर्शक सत्रे, ऑनलाईन साधने आणि तज्ज्ञांचे मार्गदर्शन हीही विशेष वैशिष्ट्ये या पोर्टलमधून उपलब्ध करून दिली जाणार आहेत.

मानवविद्या क्षेत्रातील नव्या अभ्यासक्रमांची गरज, नव्या पिढीचा दृष्टिकोन आणि त्यांना दिशा देणारे प्रकल्प हाच या उपक्रमाचा केंद्रबिंदू आहे. न्यू आर्ट्स, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेजच्या निवडीमुळे अहिल्यानगर जिल्ह्याचे शैक्षणिक स्थान अधिक भक्कम होणार आहे.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे यांनी याबद्दल समाधान व्यक्त करत विद्यार्थ्यांना अधिकाधिक संधींचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे. हे चर्चासत्र आणि 'शोध सेतु' प्रकल्प विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची आवड निर्माण करून त्यांना नव्या दिशेने प्रवास करण्यासाठी प्रेरणादायी ठरणार आहे.या प्रकल्पाचे महाविद्यालयातील समन्वयक म्हणून डॉ. नागेश शेळके काम पाहत आहेत.

ही संधी महाविद्यालयला मिळाल्याबद्दल जिल्हा मराठा विद्याप्रसारक संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, सचिव विश्वासराव आठरे पाटील, सहसचिव जयंत वाघ, खजिनदार ॲड. दीपलक्ष्मी म्हसे तसेच संस्थेचे सर्व पदाधिकारी यांनी महाविद्यालयाचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र. कुलगुरू डॉ. पराग काळकर तसेच मानवविद्या अधिष्ठाता डॉ. विजय खरे यांनी महाविद्यालय या संधीच्या माध्यमातून संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय काम करेल असा विश्वास व्यक्त केला.

# मनपाच्या अमृत फेज-२ पाणीपुरवठा योजनेचा गोरखधंदा उघड, निधी गिळंकृत, पाणी गायब !

## ठेकेदार, पीएमसी व महापालिकेच्या अधिकाऱ्यांची साखळी दोषी, फौजदारी गुन्हे दाखल करा : दीप चव्हाण

नगर - तब्बल ४०० कोटींपेक्षा अधिक खर्च करूनही अमृत पाणी योजना आणि फेज-२ पाणीपुरवठा योजना अद्याप अपूर्ण असून, नागरिकांना आजही दिवसाआड पाण्यासाठी ताटकळत राहावे लागत आहे. योजनेतील गंभीर भ्रष्टाचार, अंमलबजावणीत ढिसाळपणा, निधी दुरुपयोग आणि जबाबदारीपासून पळणाऱ्या अधिकाऱ्यांच्या भूमिकेवर आता लोकप्रतिनिधी व जनतेने आवाज उठवायला सुरुवात केली आहे.

काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष दीप चव्हाण यांनी या ठेकेदार कंपन्यांवरच नव्हे तर प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार अर्थात पी एम सी आणि महापालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी केली आहे. त्यांच्या मते ठेकेदाराला केवळ ब्लॅकलिस्ट करण्याचे नाटक करून जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न सुरू आहे.

१५ - १५ वर्ष एखादी योजना सुरु राहू शकते का ? बर योजना अपूर्ण असताना रहिवाशांना नवीन नळ जोड घेण्याचा दबाव टाकण्यात आला. आणि त्या आधारे नळ जोड धारकाकडून ५००० रुपये परस्पर घेण्यात आले. ते पैसे पालिकेत जमा न करता ते थेट ठेकेदाराला देण्यात आले. आणि उलट आयुक्त तथा प्रशासक यांनी एकाधिकार शाही वापरून पाणीपट्टी वाढीला विरोध असताना ९०० रुपयांचा भुर्दंड नगरकरांवर लादला. आम्ही तर फक्त पाणीपट्टीत २०० रुपयांचीच वाढ करा असे म्हणत होतो. त्यामुळे ही वाढ देखील बेकायदेशीर आहे असे दीप चव्हाण यांनी म्हटले आहे.

दोन ठेकेदार कंपन्यांनी योजना अर्धवट सोडून काम बंद केले असून, त्यांना केवळ काळ्या यादीत टाकण्याचा प्रस्ताव देण्यात आलेला आहे मात्र ब्लॅकलिस्टिंग करणे ही केवळ नाटकी ढाल आहे, असा आरोप चव्हाण यांनी केला. या कंपन्यांनी करोडो रुपये उचलून योजनांना रामराम ठोकला असून, त्यांच्यावर भारतीय दंड विधान अंतर्गत कलमे फसवणूक, सरकारी निधीचा गैरवापर अशा अंतर्गत गुन्हे दाखल होणे आवश्यक आहे. २०१० मध्ये सुरू झालेली योजना तीन वर्षांत म्हणजे २०१३ पर्यंत पूर्ण व्हायला हवी होती, परंतु २०२५ उजाडला तरीही योजना पूर्णत्वाला पोहोचलेली नाही. या योजनेच्या नावाखाली आतापर्यंत ३५० ते ४०० कोटी रुपयांचा खर्च झालेला असूनही नागरिकांच्या घरी एक थेंब पाणी पोहोचलेले नाही. केवळ कागदोपत्री कामं व देयकं भरली गेली आहेत. ५६५ कि.मी.च्या जलवाहिनीत मूलभूत कामंही अपूर्ण, टाक्यांची चाचणी, जोडणी, प्रेशर टेस्टिंग, कंट्रोल सिस्टम, वॉटर ट्रीटमेंट युनिट्स अद्याप रखडलेली आहेत.

चव्हाण म्हणाले की, जर ठेकेदार काम करत नसेल, तर प्रशासकीय यंत्रणा त्याच्याकडून करारनुसार जबाबदारीने काम करून घेतात. मात्र येथे याउलट पालिकेतील अधिकारी हात झटकून मोकळे झाले आहेत. यामुळे ठेकेदारांप्रमाणेच संबंधित कार्यकारी अभियंते, प्रशासकीय अधिकारी, कंत्राट मंजुरी समितीचे सदस्य, लेखा व देयक प्रक्रिया करणारे अधिकारी यांच्यावरही सहकारी दोष ठेवला जावा व फौजदारी कारवाई करण्यात यावी.

### खासदार निलेश लंके यांचा सहभाग व हस्तक्षेप


लोकसभा सदस्य निलेश लंके यांनी सदर योजनेबाबत दिशा सनियंत्रण समितीच्या बैठकीत विषय उपस्थित केला होता. त्यांनी महानगरपालिकेकडे लेखी स्वरूपात समाहिती मागवली असून, यामध्ये कार्यारंभ आदेश, डी पी आर, बिल देयकं, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांचा तपशील, दंडात्मक कारवाई, निधीचा लेखाजोखा, ₹५००० कनेक्शन फीचा वापर, आणि भुयारी गटार योजनेचा निधी वळवण्याचा मुद्दा विचारला आहे. पावसाळी अधिवेशनात जलशक्ती मंत्रालयाशी थेट चर्चा करत असताना केंद्रीय मंत्रालयाकडून थर्ड पार्टी ऑडिट करणार असल्याचेही त्यांनी सांगितले आहे. तसेच या संपूर्ण प्रकरणाची सी बी आय / स्वतंत्र समितीमार्फत चौकशी, निधीचे थर्ड पार्टी ऑडिट, दोषींवर फौजदारी कारवाई व महानगरपालिका प्रशासनाला उत्तरदायी धरण्याची मागणी केली आहे. अमृत मिशन ही योजना केंद्र सरकार अंतर्गत असून त्यामध्ये ७०% निधी केंद्र सरकारचा आणि ३०% निधी राज्य सरकारचा आहे. परंतु, निधीच्या वितरणात पारदर्शकता नसल्याचे आढळून आले आहे. केंद्र सरकारचा निधी कोणत्या तारखांना, किती टप्प्यांत, कोणत्या अटींवर वितरित करण्यात आला? राज्य शासनाचा निधी कसा आणि किती टप्प्यांत वितरित करण्यात आला? केंद्र सरकारने या योजनेसाठी सुरुवातीच्या अंदाजित खर्चापेक्षा वाढीव निधी जर दिला असल्यास, यावरही खासदार लंके यांनी विचारणा केली आहे.

नागरिकांना शुद्ध व सुरळीत पाणीपुरवठा करणे हे महानगरपालिकेचे मूलभूत कर्तव्य असून, त्या दिशेने गेल्या १५ वर्षांतही योजनांची पूर्णता न होणं, ही शहर प्रशासनाची आणि प्रशासकाची गंभीर अपयशाची नोंद मानली जात आहे. या योजनेत फक्त पैसे खाल्ले गेले, तत्कालीन व विद्यमान नेते, ठेकेदार आणि अधिकारी मिळून गब्बर झाले. आता फक्त ठेकेदारावर ब्लॅकलिस्टचा बागुलबुवा उभा करून नुसती ढाल उभी केली जातेय. जे जबाबदार आहेत त्यांच्यावर फौजदारी दाखल करावी, त्यांची चौकशी करून, टक्केवारी खाणाऱ्यांनाही अडकवावे, अशी मागणी चव्हाण यांनी केली आहे.

नगरच्या जनतेला 'शुद्ध पाणी' द्यायच्या नावाखाली गेली पंधरा वर्षे फक्त खोटं स्वप्न दाखवून कोट्यवधींचा गोरखधंदा करणाऱ्या यंत्रणेचा भांडाफोड झाल्याशिवाय आता ही योजना पूर्णत्वास जाणार नाही, हे स्पष्ट आहे.

# आरोग्य सेवक ५०% दिव्यांग हंगामी फवारणी कर्मचाऱ्यांना तात्काळ सेवेत रुजू करण्यात यावे

## निवड झालेल्या दिव्यांग आरोग्य सेवकाला सेवेत न घेतल्यास तीव्र आंदोलन



नगर - आरोग्य सेवक ५०% दिव्यांग हंगामी फवारणी कर्मचाऱ्यांना तात्काळ सेवेत रुजू करण्याचे आदेश पारित करण्याची मागणी प्रहार दिव्यांग क्रांती संस्थेच्या वतीने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. निवड झालेल्या दिव्यांग आरोग्य सेवकास सेवेत तात्काळ समाविष्ट करून घ्यावे, अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा जिल्हाध्यक्ष ॲड. लक्ष्मण पोकळे यांनी दिला आहे.

जिल्हा परिषद आरोग्य सेवक भरती सन २०२३ घेण्यात आलेली आहे. दिव्यांग बांधवांवर अन्याय झाल्याचे निदर्शनास आलेले आहे. आरोग्य सेवकाच्या (पुरुष) एकूण सात जागा होत्या. दिव्यांग प्रकार अ २, ब २, क १ आणि इ+ड या दोन जागा असताना एक उमेदवार पात्र ठरला. तर एक जागा रिक्त राहिली. वाढत्या बेरोजगारीचा विचार करून ती जागा रिक्त न ठेवता व सामान्य उमेदवारांना न देता आणि अधिनियम कायदा २०१६ नुसार कलम ३४ चा भंग न करता ज्या प्रकारात कमी जागा होत्या त्या दिव्यांगानाच देण्यात याव्या. म्हणजे दिव्यांग आरक्षणाचा कुठेही भेदभाव होणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

अस्थिव्यंग प्रकारला एकच जागा होती, तर त्यांना पण त्या जागेत समप्रमाणात घ्यावे. ज्यांची अंतिम निवड ९ जून रोजी करण्यात आलेली आहे. अशा निवड झालेल्या दिव्यांग आरोग्य सेवकास तात्काळ समाविष्ट करून घेण्याचे निवेदनात म्हटले आहे.

# अंगणवाडी सेविका मदतनीस कर्मचाऱ्यांची जिल्हा परिषदेच्या आवारात धरणे, निदर्शने

## एफ.आर.सी.मुळे टीएचआर वाटपासाठी उडालेला गोंधळ, निकृष्ट आहाराचा अंगणवाडी सेविकांना मनस्ताप



अंगणवाडी सेविका मदतनीस कर्मचाऱ्यांनी प्रलंबित मागण्यासांठी जिल्हा परिषदेत धरणे निदर्शने केली.

नगर - पोषण ट्रेकर पद्वारे टीएचआर वाटप करताना फेस रिकगनायझेशन सिस्टिममुळे (एफ.आर.सी.) उडालेला गोंधळ, निकृष्ट आहार, वेतनश्रेणी, महागाई भत्ता व मानधन वाढच्या प्रश्नासंदर्भात अहमदनगर जिल्हा अंगणवाडी सेविका मदतनीस कर्मचारी युनियनच्या वतीने जिल्हा परिषदेत धरणे आंदोलन करून निदर्शने करण्यात आली. या आंदोलनात संघटनेचे सरचिटणीस कॉ. राजेंद्र बावके, अध्यक्षा कॉ. मदिना शेख, सहचिटणीस जीवन सुरडे, मायाताई जाधव, सविता दरंदले, मन्नाबी शेख, निर्मला चांदेकर, भगीरथी पवार, शोभा पवार, रतनताई गोरे, अलका दरंदले, शोभा विसपुते, सुनिता बोर्डे, सुनिता कुंडारे, संगीता विश्वास, शशिकला औटी, सुनिता पवार, शोभा विसपुते, अलका दरंदले, शोभा येवले, भारती बोरुडे, प्रतिभा जोशी आदी सहभागी झाले होते.

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेद्वारे सहा महिने ते तीन वर्षे या वयोगटातील लाभार्थ्यांना टीएचआर वाटप केला जातो. या अगोदर पालकांचे रजिस्टर सह्या घेऊन टीएचआर वाटप केला जात होता, परंतु आता दर महिन्याच्या १० तारखेपर्यंत पोषण ट्रॅक्टरमध्ये फेस रिकगनायझेशन सिस्टिममुळे त्याचे वाटप करण्याच्या सूचना अंगणवाडी सेविकांना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार एप्रिल २०२५ या महिन्यात राज्यातील अंगणवाडी सेविकांनी पोषण ट्रॅकर ॲप मध्ये फेस रिकगनायझेशन सिस्टिममुळेद्वारे टीएचआर वाटप करण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. परिणामी टीएचआर वाटप करणे अशक्य झाले आहे.

ग्रामीण आदिवासी भागात पुरेसे नेटवर्क मिळत नसल्यामुळे पोषण ट्रॅकर प चालत नाही. देशभरातील अंगणवाडी सेविकांना फेस रिकगनायझेशन सिस्टिममध्ये काम करण्याची वेळ एकच असल्यामुळे नेमून दिलेल्या वेळेत त्यामध्ये फोटो अपलोड होत नाही. आधारशी अनेक पालकांनी मोबाई नंबर संलग्न केलेले नाही व काही पालक उपस्थित नसल्याने ओटीपी मिळू शकत नाही. सर्वर डाऊन असल्यामुळे व नेटवर्क नसल्यामुळे काम करताना अंगणवाडी सेविकांना अडचणी येत आहेत, तर तासंनतास ताटकळत बसावे लागत असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

अंगणवाडी केंद्रात लाभार्थ्यांना देण्यात येत असलेला आहार निकृष्ट दर्जाचा असून, त्याबाबत पालकांच्या मोठ्या तक्रारी येत आहेत. पालक टीएचआर स्वीकारण्यास नकार देत असल्याने कर्मचारी व लाभार्थी पालक यांच्यात वाद होत आहेत. अनेक ठिकाणी मृत साप, पाली, अळ्या, झुरळे टीएचआर मध्ये सापडल्याच्या घटना समोर आलेल्या आहेत. उन्हाळ्याच्या सुट्टीत अति उष्णतेमुळे किंवा गावी गेल्यामुळे बालकांची उपस्थिती रोडावते त्यामुळे ते आहारापासून वंचित राहतात. त्यामुळे उन्हाळ्याचे दोन महिने त्यांना शिजवलेले आहार न देता, कोरडा शिधा द्यावा. या काळात पोषण ट्रॅकर मध्ये फोटोची अट लावू नये, एक हजार पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या विभागात लोकसंख्येनुसार नवीन अंगणवाड्या मंजूर कराव्या, दूरवरच्या वाड्यावर लोकसंख्येचा निकष न लावता स्वतंत्र पूर्ण अंगणवाडी केंद्र मंजूर करण्याचे निवेदनात म्हंटले आहे.

तसेच अंगणवाडी सेविका मदतनीस यांना तीन व चार वर्गाचे कर्मचारी घोषित करून त्यांना त्याप्रमाणे वेतनश्रेणी, महागाई भत्ता व अन्य सर्व भत्ते तसेच ग्रॅच्युइटी, भविष्य निर्वाह निधी, मासिक पेन्शन आदी सामाजिक सुरक्षा लागू कराव्या, संपाच्या काळात व त्यानंतर वेळोवेळी झालेल्या वाटाघाटीमध्ये मान्य केल्यानुसार सेविका मदतनीसंना संपूर्ण ५००० व ३००० रुपये मानधन वाढ लागू करावी, प्रोत्साहन भत्ता लागू करण्याचा शासनाने एकतर्फी घेतलेला निर्णय मागे घ्यावा, राज्य शासनाने मान्य केल्याप्रमाणे अंगणवाडी कर्मचाऱ्यांना सर्वोच्च न्यायालयाने लागू केलेल्या ग्रॅच्युइटीची अंमलबजावणी करावी, कृती समितीशी झालेल्या वाटाघाटी मध्ये मान्य केल्यानुसार मासिक पेन्शन योजना ताबडतोब मंजूर करून ती लागू करण्यासंदर्भात राज्यपातळीवरील मागण्यांचा समावेश होता. या मागणीचे निवेदन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला बालकल्याण) जायभाय यांना देण्यात आले.

